। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ८३ वा । गुरूवार दिनांक ०४ जून, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### ७०,००० किंमतीचे कॉपरचे चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.१३.०५.२०२६ रोजी रिन्युग्रीन एनर्जी कंपनी नांदुर्गा यील कंपनीच्या प्लांटवरील ट्रान्सफार्मर मधील अंदाजे ७०,००० किंमतीचे कॉपरचे बसबार चोरुन नेले. अंदाजे ४०,००० चे नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विशाल अशोक तनमोर, वय ३४ वर्षे, रा. धुत्ता ता. जि. धाराशिव यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३२४(४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### इलेक्ट्रिक मोटारीची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी प्रविण पदमाकर पाटील, वय ४० वर्षे, रा. गंधोरा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे गंधोरा शिवारातील शेत गट नं ३११ मधील ५ एचपी इलेक्ट्रीक मोटर एकुण १३,००० किंमतीची ही दि. २५.०५.२०२६ रोजी गंधोरा शिवारातील शेत गट नं ३११ मधून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रविण पाटील यांनी दि.२७.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध सिगारेट आणि इतर तंबाखु जन्य उत्पादने विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, दत्ता महेश कांबळे, वय २७ वर्षे, रा. इंदीरानगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.०१.०६.२०२६ रोजीकळंब येथे बसस्थानकाचे मोकळ्या जागेत महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ तंबाखु १,२०० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी तंबाखु जन्य साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम ६(ब), २४, सिगारेट आणि इतर तंबाखु जन्य उत्पादने अधिनियम २००३ अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### बसस्थानक तुळजापूर येथे मिनीगंठणची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गत फिर्यादी स्वाती लहु माळी, वय ३७ वर्षे, रा. बार्शी जि. सोलापूर दि. ०१.०६.२०२६ रोजी बसस्थानक तुळजापूर येथे सोलापूर ते नांदेड बसमध्ये चढताना अज्ञात व्यक्तीने स्वाती माळी यांचे गळ्यातील २७ ग्रॅम वजनाचे सोन्याची मिनीगंठण ५०,००० किंमतीचे गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-स्वाती माळी यांनी दि.०१.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# जलस्त्रोत बळकटीकरणासाठी व्यापक उपाययोजना करा; पाण्याचा अपव्यय टाळा

## संभाव्य अल निनो व चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश



धाराशिव (जिमाका) संभाव्य अल निनो परिस्थितीमुळे उद्भवू शकणाऱ्या पाणीटंचाईवर प्रभावीपणे मात करण्यासाठी सार्वजनिक व खासगी विहिरी, हातपंप तसेच रिचार्ज शाफ्ट परिसरात मोठ्या प्रमाणावर भूगर्भात पाणीसंचयन होईल अशा पद्धतीने 'जलतारा खड्डे' तयार करावेत. तसेच सार्वजनिक इमारतींवरून पडणारे पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यासाठी भूजल पुनर्भरणासारखे उपक्रम राबवून जलस्रोत बळकट करावेत.पाण्याचा आवश्यक तेवढाच वापर करून त्याचा अपव्यय टाळावा,असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले.

जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी आज मंगळवारी (दि.२ जून) त्यांच्या दालनातून संभाव्य अल निनो आणि चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पाणीटंचाई व चारा उपलब्धतेबाबत आयोजित आढावा बैठकीत हे निर्देश दिले.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर,पाटबंधारे महामंडळाचे अधीक्षक अभियंता विजय थोरात,नगरपालिका प्रशासन विभागाचे जिल्हा सहआयुक्त त्र्यंबक ढेंगळे, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ.डी.एम.मुळे,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे वरिष्ठ वैज्ञानिक आर.व्ही.मांजरमकर, धाराशिव पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता ए. एन.मदने,ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एम.एम. कटकधोंड,मृद व जलसंधारण विभागाचे जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रभाकर महामुनी,धाराशिव पाटबंधारे विभाग क्रमांक दोन (उमरगा) चे कार्यकारी अभियंता सूर्यकांत नलवडे,धाराशिव नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे,जिल्हा परिषद यांत्रिकी विभागाचे उपअभियंता एस.पी. शिंदे उपस्थित होते.तसेच सर्व उपविभागीय अधिकारी,तहसीलदार, गटविकास अधिकारी, नगरपालिकांचे मुख्याधिकारी आणि संबंधित विभागांचे अधिकारी ऑनलाइन माध्यमातून सहभागी झाले होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री.पुजार म्हणाले की,पुढील वर्षीही भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे आतापासूनच सूक्ष्म नियोजन करून भूगर्भातील पाणीसाठा वाढविण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. मोठ्या प्रकल्पांतील पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले आहे.सिंचन प्रकल्प परिसरातील गावांमध्ये पाण्याची पातळी समाधानकारक असल्यास विनाकारण विहिरी व विंधन विहिरी अधिग्रहित करू नयेत.तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी संयुक्त पाहणी करून ज्या विहिरी पाणीपुरवठ्यासाठी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत,त्यांची प्रत्यक्ष गरज तपासावी.

ग्रामपंचायतींनी स्वतःचे जलस्रोत सक्षम करण्यासाठी विशेष मोहीम हाती घ्यावी. तसेच सिंचन प्रकल्पांतील पाणी परिसरातील गावांच्या पिण्याच्या गरजांसाठी अधिग्रहित करण्याची कार्यवाही करावी,असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात भूगर्भातील पाणीसाठा वाढविण्यासाठी 'जलतारा खड्डे' हा उपक्रम व्यापक प्रमाणावर राबविण्याचे निर्देश देत श्री.पुजार म्हणाले की,सुधारित टंचाई निवारण आराखडा तयार करण्यात यावा. विहिरींमधील गाळ काढणे,त्यांची दुरुस्ती तसेच हातपंप दुरुस्तीची कामे तातडीने हाती घ्यावीत.शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील विहिरींजवळ व शेतात जलतारा खड्डे तयार करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

सार्वजनिक आणि खासगी इमारतींवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे संचयन करण्यासाठी भूजल पुनर्भरणाची कामे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी पुढाकार घेऊन करावीत.पाणीपुरवठा योजनांमधील गळती तातडीने थांबवावी. तसेच सिमेंटच्या पोत्यांत रेती भरून नदी-नाल्यांतील वाहते पाणी अडवून त्याची भूगर्भात साठवण करण्यासाठी ग्रामस्थांनी श्रमदानातून पुढाकार घ्यावा,असे आवाहनही त्यांनी केले.

निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनीही पाणीटंचाईग्रस्त गावांसाठी अधिग्रहित केलेल्या विहिरींची तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करावी तसेच शेतकऱ्यांना जलतारा खड्डे तयार करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे सांगितले.

बैठकीत ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एम. एम.कटकधोंड यांनी माहिती दिली की,सध्या धाराशिव तालुक्यातील सात गावांना ११ खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून ५२ खासगी विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.तुळजापूर तालुक्यात नऊ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.भूम तालुक्यातील दहा गावांसाठी २२ विहिरी तसेच चार गावांसाठी पाच खासगी टँकर कार्यरत आहेत.याशिवाय १५ गावांसाठी १६ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.जिल्ह्यात एकूण ११ गावांना १६ खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून ६५ गावांसाठी ९९ खासगी विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.

पाटबंधारे महामंडळाचे अधीक्षक अभियंता विजय थोरात यांनी सांगितले की,धाराशिव पाटबंधारे विभाग क्रमांक एक व दोन अंतर्गत एकूण २२६ प्रकल्प आहेत.त्यामध्ये एक मोठा,१७ मध्यम आणि २०८ लघु प्रकल्पांचा समावेश आहे.या सर्व प्रकल्पांमध्ये ७२८.८० दलघमी उपयुक्त पाणीसाठा क्षमता असून २९ मे २०२६ अखेर १२०.७४२ दलघमी म्हणजेच १६.५८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ.डी.एम.मुळे यांनी सांगितले की, जिल्ह्यात ७ लाख ९० हजार ३९९ इतके पशुधन असून त्यासाठी दररोज ३ हजार ८९ मे.टन वैरण आवश्यक आहे. उपलब्ध व संभाव्य वैरण साठा ४ लाख ६३ हजार ३५० मे.टन असून तो ऑक्टोबर २०२६ पर्यंत पुरेल इतका आहे.

वैरण विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून ५० हजार किलो संकरित मका बियाण्यांचे वितरण करण्यात आले असून त्यातून सुमारे २ लाख ५० हजार मे.टन चारा उत्पादन अपेक्षित आहे.तसेच विदर्भ-मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पांतर्गत ५,२२० किलो संकरित मका बियाणे ५२२ पशुपालक शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले असून त्यातून २६ हजार १०० मे. टन चारा उत्पादन अपेक्षित आहे.

एकूण ५५ हजार २२० किलो संकरित मका बियाणे १३ हजार २२ पशुपालकांना वितरित करण्यात आले असून त्याची लागवड १३ हजार ८०५ एकर क्षेत्रावर करण्यात येत आहे.यामधून सुमारे २ लाख ७६ हजार १०० मे.टन चारा उत्पादन होण्याची अपेक्षा असल्याची माहिती डॉ.मुळे यांनी दिली.

बैठकीत ऑनलाइन सहभागी झालेल्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी पाणीटंचाईवर मात करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजना व कामांचा आढावाही सादर केला

# उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद निवडणुकीसाठी नोडल अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित

धाराशिव (जिमाका) उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि प्रभावीपणे पार पाडण्यासाठी विविध विभागांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या जबाबदाऱ्याही निश्चित करण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रियेतील विविध कामकाजांचे समन्वय,आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी,कायदा व सुव्यवस्था, मतदान,मतमोजणी,निवडणूक साहित्य वितरण,माध्यमांचे संनियंत्रण तसेच विविध परवानग्यांसाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

यामध्ये अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्याकडे आदर्श आचारसंहिता (एमसीसी) नोडल अधिकाऱ्याची जबाबदारी देण्यात आली आहे.जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे हे निवडणूक निरीक्षकांचे संपर्क अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर हे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम करतील.यांच्याकडे नामनिर्देशन स्वीकृती कक्ष,कायदा व सुव्यवस्था,वाहन व्यवस्था जबाबदारी सोपविण्यात आली आहे.उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख हे मतमोजणी कक्ष तयार करण्यासाठी नोडल अधिकारी म्हणून कार्यरत राहतील.

उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) स्वाती शेंडे यांच्याकडे मतदान अधिकारी व कर्मचारी व्यवस्थापन कक्षाची जबाबदारी आहे.उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अरुणा गायकवाड या अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण कक्षाच्या नोडल अधिकारी म्हणून कार्य पाहतील.

उपजिल्हाधिकारी (मध्यम प्रकल्प) संतोष राऊत यांच्याकडे निवडणूक साहित्य वितरण व स्ट्राँगरूम व्यवस्थापनाची जबाबदारी देण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रवीणकुमार धरमकर हे मतपत्रिका छपाई व वितरणाचे कामकाज पाहणार आहेत.


राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक हर्षवर्धन शिंदे यांच्याकडे अवैध दारू वाटप प्रतिबंध कक्षाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे हे माध्यम व संनियंत्रण समिती (एमसीएमसी) तसेच मीडिया व्यवस्थापनाचे नोडल अधिकारी म्हणून कार्यरत राहतील.तसेच तहसीलदार (संगायो) दत्तात्रय गायकवाड यांच्याकडे विविध परवानग्या व चौकशी कक्ष (एक खिडकी योजना) यांची जबाबदारी देण्यात आली आहे.

निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा वेळेत व नियमांनुसार पार पडावा,तसेच संबंधित विभागांमध्ये प्रभावी समन्वय राहावा यासाठी या नियुक्त्या करण्यात आल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व नोडल अधिकारी आपापल्या जबाबदाऱ्यांची प्रभावी अंमलबजावणी करणार असून निवडणूक प्रक्रिया निर्भय,निष्पक्ष आणि पारदर्शक वातावरणात पार पडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

# मोटरसायकलच्या डिग्गीत ठेवलेले चार लाख चोरले : गुन्हा दाखल

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, फिर्यादी नामे-अर्जुन सुंदरराव मारकड, वय ५० वर्षे, रा. सोनगिरी ता. भुम जि. धाराशिव यांचे मोटरसायकल क्र एमएच ३३ ई २०५७ चे डिग्गीत स्टॉलमध्ये गुंडाळुन ठेवलेले रोख रक्कम ४,००,००० ऋषीकेश रा. भुम व त्याचे दोन साथीदार यांनी दि. २९.०५.२०२६ रोजी १७.१० वा. सु. सरकारी दवाखाना भुम येथुन चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अर्जुन मारकड यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो. ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह दोन दिवस पाऊस; केळी-पपईच्या बागा भुईसपाट



भूम (प्रतिनिधी)-मागील तालुक्यात सोमवारी वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील अनेक भागांत मोठे नुकसान झाले आहे. कासारी गावात बब्रुवान अजिनाथ पाटुळे यांच्यासह पाच घरांवरील पत्रे उडून गेले. शेतातील सौर ऊर्जा पॅनेल व केळीच्या बागांचेही मोठे नुकसान झाले. तालुक्यातील कासारी येथे वादळी वाऱ्याचा सर्वाधिक फटका बसला. घरांवरील पत्रे उडून गेल्याने घरातील अन्नधान्य, कपडे व इतर जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले. शेतातील सौर ऊर्जा पॅनेल कोसळले असून, केळी पिके जमीनदोस्त झाली आहेत.

एप्रिल महिन्याच्या सुरुवातीच्या अवघ्या ९ दिवसांत तब्बल १७.४ मिमी पावसाची नोंद झाली. त्याची सरासरी २२०% आहे. तर मे महिन्याच्या पहिल्या ९ दिवसांतही १८.७ मिमी पाऊस झाला असून, हे प्रमाण सरासरीच्या ७२ टक्के इतके आहे. गतवेळी मे महिन्यात धो धो पाऊस झाला होता. यंदा मात्र एप्रिलपासून अवकाळी पावसाला सुरुवात झाली आहे. रखरखत्या उन्हाळ्यात पाऊस पडत असल्याने काही अंशी दिलासा मिळाला.

हवामान खात्याने २५ मे ते ५ जून या कालावधीत यंदाच्या हंगामातील सर्वाधिक तापमान राहील, असा अंदाज वर्तवला होता. मात्र, अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे पट्टे निर्माण झाल्याने ढगांची दाटी झाली. तापमानात थेट ६ अंश सेल्सिअसने घसरण झाली आहे. पुढील तीन दिवस जिल्ह्यात असाच तुरळक पाऊस राहील, असा अंदाज हवामान तज्ज्ञ डॉ. शेख महमंद बाबर यांनी सांगितले.

२ ते ४ जून या कालावधी पडणारा पाऊस हा मान्सून पूर्व पाऊस असेल. मान्सून ७ जून पर्यंत मुंबईच्या समुद्र किनारपट्टीला धडकणार आहे. त्यानंतर १० जूनपर्यंत मान्सून धाराशिव जिल्ह्यात येणार आहे. त्यामुळे पुढील तीन दिवस होणारा पाऊस हा मान्सून पूर्व पाऊस असेल.शेतकऱ्यांनी आताच पेरणीची घाई करुन नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. मान्सूनच्या पावसानंतर चांगला ओलावा झाल्यानंतर पेरणी करावी लागणार आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## अमेरिकेची चाल ओळखा

अमेरिका भारताला अधिक टॅरिफच्या माध्यमातून लुट करणार आहे. एकीकडे इराणशी युद्ध करून जगाला अर्थिक संकटात लोटण्याचा प्रयत्न होत आहे तर दुसरी कडे अनेक देशावर टॅरिफ लादण्याचा डाव अमेरिकेचा आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेचे सुत्र हाती घेतल्यापासून जागतिक आर्थिक अशांतता निर्माण झाली आहे. कारण नसताना इतर देशाला डवचले जात आहे. निर्यातीवर बंदी घातली जात आहे. जग वरचेवर जवळ येत असताना अशांतात निर्माण करून काय साध्य करावयाचे आहे हेच ट्रम्प यांना कळते का नाही हेच समजून येत नाही. जगाला इंधन पुरविणारा देश इराण आहे. हे सर्वांना माहिती आहे. अशा स्थितीत जागतिक शांततेपेक्षा अस्थिरता करण्याचा प्रयत्न चालू आहे. सतत गैरसमजुतीचे वक्तव्य करणे. एक इराण अमेरिकेला घाबरत नाही तर जशास तसे उत्तर देत आहे. इराण हा अमेरिकेला उलट निर्बंध म्हणजे अटी घालत आहे. एक लहान देश महासत्ताधिश अमेरिकेला शह देत आहे कारण राष्ट्राभिमानी जनता आहे म्हणून अमेरिकेला घाबरत नाही. इराणकडे सर्वात मोठी चावी म्हणजे कच्चे तेल इंधन आहे. याच्या जोरावर जो जगाला नरम करू शकतो. या युद्धाचा परिणाम हा जगभर झाला आहे. इंधनाच्या तुटवड्यामुळे महागाई वाढली आहे. महागाई गगणाला भिडली आहे. काही देश लॉकडावुनच्या तयारीत आहे. इंधनाचा भडका उडला तर एकमेव लॉकडावुन हा पर्याय आहे. जो पर्यंत युद्ध थांबणार नाही व जो पर्यंत अनेक राष्ट्र एकत्र होवून अमेरिकेवर दबाव निर्माण करणार नाहीत तो पर्यंत जागतिक अशांतात निर्माण होत राहणार आहे. जागतिक अशांतात माजवुन अमेरिकेला काय साध्य करावयाचे आहे हेच समजुन येत नसले तरी याचा परिणाम काही दिवसानंतर त्यालाच भोगावा लागणार आहे. भारत हा लोकसंख्येच्या मानाने मोठा देश आहे. अशा देशात युद्धाचा परिणाम होतो. भारतात डिझेल व गॅस सिलेंडरची कमतरता भासत आहे. याची तिव्रता कमी असली तरी परिणाम जाणवत आहे. मुळात इराणशी युद्ध करण्यामागे अमेरिकेला काय गरज पडली हा विचार करायला लावणारा प्रश्न आहे. त्यामुळे या बाबीचा परिणामावर मात करण्यासाठी भारतीयांनी सदैव तयार असले पाहिजे. आता तर कठिण परस्थिती आहे. युद्ध थांबेल अशी परिस्थिती दिसून येत नाही. वरचेवर परिस्थिती चिघळत चालली आहे. होर्मुजवर आता पुर्ण ताबा मिळविण्याचा डाव आहे. याच मार्गाने जगाला इंधन पुरविले जाते. त्यामुळे या भागा व मार्गावर आपला ताबा असावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. यामार्गावरील जहाजावर लक्ष्य केले जात आहे. मुख्य वाहातुकीचा मार्ग होर्मुज असल्याने नाकाबंदीचा अमेरिकेचा विचार आहे हे लक्षात घेतले पाहिजे. युद्ध चालू आहे. अमेरिका आडमुठीपद्धतीने वागत आहे. याचा परिणाम जगाला सोसावा लागत आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत भारतीयांनी काय केले पाहिजे याचा विचार केला पाहिजे. भारतीयांना केवळ काटकसर करून चालणार नाही तर योग्य प्रकारे मात करावी लागणार आहे. एकतर अमेरिकेला घाबरून चालणार नाही. दुसरे युद्ध समाप्त होईलच असे नाही. झाले तर चांगले. त्यामुळे युद्धामुळे निर्माण होत चाललेली परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी एका धोरणाची गरज आहे. ते म्हणजे इंधनाला पर्याय शोधला पाहिजे. जवळपास सर्वच बाबी ह्या सौरउर्जेवर चालविल्या पाहिजेत. याबाबत आता सरकारची भुमिका महत्त्वाची ठरणार आहे. सरकार या बाबत किती पुढाकार घेईल. या बाबत धोरणाची अमलबजावणी कशी करेल हे पाहाणे औचित्याचे ठरणारे आहे. जसे ई-बाईक काढून पेट्रोलवर मात केली आहे. त्यामुळे अधिक गाड्या ह्या पेट्रोलच्या असूनसुद्धा पेट्रोलची टंचाई नाही, केवळ डिझेलची टंचाई भासत आहे. घरगुतीगॅसची टंचाई नाही ती कृत्रिम निर्माण केली जात आहे. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही. इंधन टंचाई बाबत भय निर्माण केले जात आहे. यामागील उद्देश हाच आहे की, काळाबाजार करण्यात मदत होणार आहे. मुळात आपल्या देशात ज्यावेळी संकट आले की त्याचवेळी पर्याय शोधले जातात. परदेशात तसे होत नाही. परदेशिय अगोदरच स्वावलंबी होतात. आपल्या देशातील उत्पादित माल स्वत: खाण्यासाठी खरेदी केली जाते. जपानमध्ये मोठा तांदुळ उत्पादित होतो. भारतीय बासमती तांदुळ घेत नाहीत. आपल्या देशातील आपल्या शेतकऱ्याचा माल आपण खरेदी केला तर नफा आपल्या शेतकऱ्यांना होता. बासमती तांदुळ खरेदी केला तर भारतीय शेतकऱ्यांना फायदा होता. असे राष्ट्रप्रेम जपानीनागरिकात आहे. त्यामुळे असे कितीतरी संकट आले तरी घाबरत नाहीत. इंधनाबाबत स्वयंपुर्ण आहे. अधिक वापर मोफत सौरउर्जेचा केला जातो हे लक्षात घेतले पाहिजे. मोबाईल कशावर चालते हवेवर मग कंपन्या हवेला पैसा मोजतात का? भारतीय विचार करीत नाहीत. ट्रम्प जो पर्यंत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आहे तो पर्यंत सुख व समाधानाची झोप लागणार नाही. काही तरी अशांतात निर्माण करण्याचे काम त्यांच्या हातून होत राहाणार आहे. मुळात भारतीयांनी तातडीने सौरउर्जेचा वापर केला पाहिजे. तातडीने योग्य तो मार्ग जनतेला दाखविला आहे. केवळ काटकसर करा ही सुचना झाली मार्ग दाखविला जात नाही. मुळात आता पर्यंत आपल्या राज्य असो किंवा केंद्र सरकारने तातडीने पावले उचलली पाहिजे होते. ईव्हीव्हिकल मोठ्या प्रमाणात चालविल्या गेल्या पाहिजेत. त्या अतिषश स्वस्तात मिळाल्या पाहिजे. गॅसची टाकी ही स्वयंपाकास लागते. तो गॅस स्वयंपाक शिजविण्यासाठी लागतो. त्यामुळे पर्याय सौरउर्जावर शिजविला पाहिजे. सौरचुली घरोघरी मोफत दिल्या पाहिजेत. आज ईव्ही गाडी परवडत नाही. यात मोठया प्रमाणात संशोधन झाले पाहिजे. संशोधन न करता घ्या, असे सांगणे योग्य नाही. बॅटऱ्या भारतातच तयार झाल्या पाहिजेत. त्या होत नाही. सौरउर्जेला लागणाऱ्या प्लेटा भारतीय बनावटीच्या असल्या पाहिजेत. जर परदेशातून आयात करून ते देणे परवडणारे नाही. भारत स्वयंपुर्ण असला पाहिजे. आयात माल करण्यापेक्षा देशाने निर्यातीकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. भारत तसे पाहिले तर स्वयंपुर्ण कमी आहे तर आयात अधिक करणारा देश आहे. त्यामुळे विसंगता आल्याने संकटात वाढ होते. संकटे निर्माण होत आहेत. याला जबाबदार नागरिक आहेत. केवळ काटकसर करून चालणार नाही तर पर्याय शोधला पाहिजे. त्याचा वापर होणे अपेक्षित आहे. जागतिक स्तरावर अशांतता राहावी. अधिक टॅरिफ लावुन लुट करावी. हा उद्देश आहे. अनेक बाबी भारतासारख्या देशाला अमेरिकेतून मागवाव्या लागतात. आपल्या पुर्वजांनी, देशाभिमानी स्वावलंनचा नारा दिला त्याला धुडकावल्याने आज चिंताजनक स्थिती मिर्माण झाली आहे. अमेरिका जोपर्यंत ट्रॅम्प आहेत तो पर्यंत शांततेत जीवन जगता येवू शकणार नाहीत. हे लक्षात घेवून कोणती व कशी उपायोजना करावी याचा विचार गंभीरातेने भारतीयांनी करावा. संकट गडद होत चालले आहे. सावधता बाळगणे आवश्यक आहे.

# एका मखमली स्वरयुगाचा अंतः सुमन कल्याणपूर

मावळला तारा, आभाळ हे पावन,
स्वरांच्या सागरात, विरघळले भुवन।
काळाच्या पडद्यावर, दरवळतो हा सुगंध,
अनादी-अनंत, हा तुझ्या सुरांचा ऋणानुबंध...



काही आवाज संपत नाहीत; ते फक्त कानातून उतरून आठवणींच्या श्वासात राहायला जातात.

ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांच्या निधनाने भारतीय संगीतविश्वातील एक रेशमी आणि निरागस स्वर कायमचा शांत झाला आहे. दवात भिजलेल्या जुईच्या फुलासारखा मखमली आवाज असलेल्या सुमनताईंनी आपल्या कारकीर्दीत अनेक अजरामर हिंदी व मराठी गाणी रसिकांना दिली. पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित असलेल्या त्यांनी आपल्या गायकीतील शालीनता व संयम शेवटपर्यंत जपला आज त्या आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्वरांचा सुगंध आणि त्यांच्या गायकीचा वारसा रसिक मनांत सदैव जिवंत राहील.

भारतीय संगीतविश्वाच्या नभांगणात अनेक तारे चमकले आणि मावळले, पण काही स्वर असे असतात जे काळाच्या पडद्याआड गेल्यानंतरही अंतराळात गुंजत राहतात. ३१ मे २०२६ रोजी ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांनी वयाच्या ८९ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला आणि एक मखमली, रेशमी स्वरयुग कायमचे शांत झाले. सुमनताईंचे जाणे म्हणजे केवळ एका गायिकेचे निधन नाही, तर तो आपल्या कानात अनेक दशके मोरपीस फिरवणाऱ्या एका नाजूक, निरागस आणि निरामय स्वराचा अस्त आहे.

सुमन कल्याणपूर हे नाव उच्चारताच डोळ्यासमोर येते ती एक सात्विक आकृती आणि कानांवर पडते ती एक गोड सुरावट. त्यांच्या आवाजाची तुलना नेहमीच दवात भिजलेल्या जुईच्या फुलाशी केली जाते. जुईचे फूल जसे नाजूक, सुगंधी आणि कोमल असते, तसाच त्यांचा आवाज होता. त्या कधीही आक्रस्ताळी गाणी गाताना दिसल्या नाहीत. त्यांचा गळा, त्यांची गायकी आणि त्यांची एकूणच सादरीकरणाची पद्धत एका राजस आणि शालीन व्यक्तिमत्त्वाची साक्ष देत असे.

१९३७ मध्ये ढाका येथे जन्मलेल्या सुमन हेमाडी यांचा प्रवास कलेच्या वाटेवरूनच झाला. सुरुवातीला चित्रकलेची ओढ असलेल्या सुमनताईंनी पुढे संगीतालाच आपले जीवन मानले. १९५४ मध्ये मंगु चित्रपटातील कोई पुकारे धीरे से तुझे या गाण्याने सुरुवात झाली आणि त्यानंतर आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे, ना जाने क्यों होता है सारख्या हिंदी गाण्यांनी त्यांनी संपूर्ण चित्रपटसृष्टीला मोहून टाकले. विशेषतः मोहम्मद रफी यांच्यासोबतची त्यांची द्वंद्वगीते म्हणजे संगीताचा एक सुवर्णकाळ होता.

मराठी रसिकांसाठी तर त्या मायेचा ओलावा होत्या. जिथे सागरा धरणी मिळते, निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई, घाल घाल पिंगा वाऱ्या किंवा शब्दा शब्द जपून ठेव यांसारखी गाणी म्हणजे मराठी संस्कृतीचा अविभाज्य भाग बनली आहेत. दशरथ पुजारी, वसंत प्रभू यांसारख्या दिग्गज संगीतकारांच्या चालींना आपल्या स्वरांचे अस्तर देऊन त्यांनी जी गाणी अजरामर केली, ती आजही तितकीच ताजी आणि नवथर वाटतात. त्यांच्या आवाजात एक प्रकारची जव्हारी होती, एक न टोचणारी धार होती, ज्यामुळे शास्त्रीय रागांवर आधारित गाणीही त्या कमालीच्या सहजतेने गाऊ शकत होत्या.

पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित असलेल्या सुमनताई केवळ एक गायिका नव्हत्या, तर त्या संगीतातील संयमाचे एक प्रतीक होत्या. जेव्हा गायकीचा बाजा डिग्री होत चाललेल्या प्रवाहाकडे कल वाढला, तेव्हा स्वतःच्या अटींवर आणि आनंदासाठी गाणे निवडण्याचे धाडस त्यांनी दाखवले. त्यांना गाजावाजा आवडला नाही. त्या आल्या, त्यांनी आपल्या स्वरांचा सुगंध पसरवला आणि जेव्हा वाटले की आता थांबायला हवे, तेव्हा त्या शांतपणे अलिप्त झाल्या. हा अलिप्तपणा आजच्या कोलाहलाच्या युगात दुर्मिळ आहे.

त्यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी ही माहितीच्या आकड्यांनी भरून निघणारी नाही. मुगले आझमच्या अनारकलीने म्हटले होते, फूलों को मुरझाने का खौफ रहता है! पण सुमनताईंच्या आवाजाचे प्राजक्त कधीही कोमेजणार नाही. त्यांच्या स्वरांचे हे रेशमी वस्त्र आजही आपल्या कानांवरून सळसळून जाईल आणि आपल्याला सुखावेल.

आज त्या आपल्यात नाहीत, पण त्या ज्या स्वरांच्या विश्वात जगल्या, तो स्वर मात्र आजही आपल्या आठवणींच्या श्वासात जिवंत आहे. त्यांच्या आवाजाच्या लकेरी आता शांत झाल्या असल्या तरी, त्यांच्या प्रतिध्वनींनी अवघे संगीतविश्व पावन झाले आहे.
सुमनताई, तुमच्या त्या अथांग आवाजाच्या सागरात आम्ही आज स्तब्ध होऊन नतमस्तक होतो. तुमच्या स्वरांचा सुगंध असाच चिरंतन दरवळत राहो...

स्वरांचे प्राजक्त
जुईच्या पाकळीत जसा, गंधाचा संवाद,
तुझ्याच कंठातून बहरला, सात्विक हा नाद।
मखमली चांदण्यांची, रेशमी ही सावली,
स्वरांच्या नभांगणी, स्वरांनी तू पावली... ।। १ ।।
अविट, मधुर स्वरधार, त्यात अमृत ओलावा,
शब्दांच्या गाभाऱ्यात, साठला तुझा ठेवा।
निंबोणीच्या सावलीत, लपले तुझे गाणे,
आठवणींच्या श्वासात, गुंफलेले नहाणे... ।। २ ।।
मावळला तारा, आभाळ हे पावन,
स्वरांच्या सागरात, विरघळले भुवन।
काळाच्या पडद्यावर, दरवळतो हा सुगंध,
अनादी-अनंत, हा तुझ्या सुरांचा ऋणानुबंध... ।। ३ ।।
।।भावपूर्ण श्रद्धांजली!।।

**- राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**

# विजपूरवठा सूरळीत करा अन्यथा महावितरण वर गाढव मोर्चा..

## सम्राट मित्रमंडळाचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन



**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर शहरातील विस्कळीत झालेला वीजपुरवठा युध्द पातळीवर सूरूळीत करावा अन्यथा सम्राट मित्र मंडळाच्या वतीने महावितरण कार्यालयावर गाढव मोर्चा काढण्यात येईल असा ईशारा येईल सम्राट मित्रमंडळाच्या वतीने कार्यकारी अभियंता यांच्याकडे एका निवेदनाद्वारे दिले आहे.

सबस्टेशन येथे महावितरणचे अधिकारी आले असता एका शिष्टमंडळासह त्यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

निवेदनात पूढे म्हटले आहे की,सध्या अहमदपूर शहरामध्ये गेल्या दहा ते पंधरा दिवसापासून लाईटचा प्रचंड खेळखंडोबा झालेला आहे. अर्ध्या अर्ध्या तासाला विज गायप होत आहे.
अनेकवेळा अर्धे अधिक शहर अंधारामध्ये रात्री राहते या लाईटच्या लपंडावामुळे पहिलेच दिवसभर वाढलेले तापमान त्यातून रात्री अप रात्री जाणारी लाईट यामुळे घरातील फॅन कुलर चालू करता येत नाहीत पर्यायाने लहान लहान मुले वृद्ध माणसे या सगळ्यांची प्रचंड मोठी अडचण होत आहे.

या संबंधाने आपल्याकडे वारंवार फोनवरून निरोप देऊन सुद्धा कुठलीच कार्यवाही होत नाही त्यामुळे पुढील काळामध्ये अहमदपूर शहराचा वीजपुरवठा सुरळीत करावा अन्यथा आपल्या कार्यालयावर गाढव मोर्चा काढण्यात येईल.याची कृपया नोंद घ्यावी.

**प्रमुख मागण्या:-**

१) अहमदपूर शहरातील फ्युज कॉलचा फोन नंबर २४ तास चालू ठेवावा.नागरीकांनी कॉल केल्यास कॉल उचलण्याच्या सूचना संबंधितांना द्यावे.
२)नागरिकांनी फ्युज कॉल ला रात्री अपरात्री कुठल्याही परिस्थितीत अखंडित पुरवठा वीज पुरवठ्यासाठी कॉल केला तर विभागाच्या वतीने आवश्यक ती उपायोजना तातडीने करावी.
३)अहमदपूर सबस्टेशन येथे गेल्या अनेक दिवसांपासून जमीनीवर धूळखात असलेला १० चा ट्रान्स्फॉर्मर तातडीने चार्ज करावा.
४)अहमदपूर शहरासाठी तातडीने स्वतंत्र शहर अभियंत्याची नेमणूक करावी.
५)शहरात आवश्यक त्या ठिकाणी वाढत्या वीज मागणीची दखल घेवून जास्तीचा ट्रान्स्फॉर्मर बसवून द्यावे.
६)शहरासाठी स्वतंत्र सबस्टेशन ची तातडीने मंजूरी करावी.
७)दिवसभर लाईटचा येणे जाणे चालू असुन त्याचा नागरीकांना त्रास होत आहे.तरी अखंडित विज पूरवठा चालू करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना कराव्या.
८)ऐक्सप्रेस फिडर विना अडथळा व्यवस्थित चालण्यासाठी आवश्यक ती उपायोजना करावी.
९)अहमदपूर शहर पाणी पूरवठ्यासाठी अखंडित विज पूरवठा करावा.

या वरील मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी अन्यथा आपल्या कार्यालयावर दिनांक १५ जून रोजी गाढव मोर्चा काढण्यात येईल याला सर्वस्वी महावितरणचे अधिकारी जबाबदार असतील असा ईशारा देण्यात आला आहे.
या वेळेस सम्राट मित्रमंडळाचे अध्यक्ष युवकनेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी,मौलाना आझाद विचारमंच चे अध्यक्ष मोहम्मद पठाण,शेख रहीमभाई,नौशाद सय्यद, उमरखान पठाण,आकाश पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# एपीटीआय (एमएस) महिला मंचाच्या मराठवाडा विभागीय समन्वयकपदी डॉ. पद्मजा गिराम यांची निवड




**अहमदपूर/प्रतिनिधी :** लातूर चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील फार्माकॉलॉजी विषयाच्या विभाग प्रमुख डॉ. पद्मजा गिराम यांची एपीटीआय (Association of Pharmaceutical Teachers of India - Maharashtra State) महिला मंचाच्या मराठवाडा विभागीय समन्वयक पदावर निवड झाली आहे. फार्मसी शिक्षण क्षेत्रातील त्यांचे उल्लेखनीय योगदान, प्रभावी नेतृत्व तसेच महिला सक्षमीकरण आणि व्यावसायिक विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखलघेऊन त्यांची या प्रतिष्ठेच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. गिराम यांनी फार्मसी शिक्षणाच्या उन्नतीसाठी तसेच विद्यार्थिनी व महिला फार्मसी व्यावसायिकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या या निवडीमुळे चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर तसेच संपूर्ण मराठवाडा विभागासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली एपीटीआय (एमएस) महिला मंचाच्या मराठवाडा विभागातील कार्याला अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुण हालकुडे, प्राचार्य डॉ. अविनाश टेकाडे, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी डॉ. गिराम यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सायकलचा प्रेरणादायी प्रवास



३ जून रोजी जगभरात 'जागतिक सायकल दिन' साजरा केला जातो. सायकल केवळ प्रवासाचे साधन नसून आरोग्य, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेशी जोडलेला महत्त्वाचा घटक आहे. बदलत्या काळानुसार वाहतुकीची अनेक आधुनिक साधने उपलब्ध झाली असली तरी सायकलचे महत्त्व आजही कायम आहे.

एकेकाळी सायकल असणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जात होती. अनेक भागांमध्ये लग्नात सायकल हा मानाचा आहेर म्हणून दिला जात असे. एखाद्या व्यक्तीने नवीन सायकल घेतली की गावातील लोक ती पाहण्यासाठी येत असत. त्या काळात सायकल ही सर्वसामान्यांसाठी मोठी संपत्ती मानली जात होती.

संयुक्त राष्ट्र महासभेने एप्रिल २०१८ मध्ये ३ जून हा दिवस 'जागतिक सायकल दिन' म्हणून घोषित केला. सायकलचा शोध १८व्या शतकात लागला. त्यानंतर तंत्रज्ञानाच्या मदतीने तिच्यात अनेक बदल झाले. आज बाजारात रोड बाईक, माउंटन बाईक, फोल्डिंग बाईक, टूरिंग बाईक आणि इतर आधुनिक प्रकार उपलब्ध आहेत.

भारतातही सायकलचा इतिहास खूप समृद्ध आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक दशकांपर्यंत सायकल हे देशातील सर्वात लोकप्रिय वाहतूक साधन होते. शेतकरी आपल्या मालाची वाहतूक सायकलवरून करत असत. दूध विक्रेते, पोस्टमन आणि कारखान्यातील कामगार यांच्यासाठी सायकल हेच मुख्य साधन होते. कमी खर्च आणि सोपी देखभाल यामुळे सायकलने देशाच्या आर्थिक प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावली.

मध्य प्रदेशातील इंदूर शहरात एकेकाळी सायकल चालवण्यासाठी परवाना घ्यावा लागत असे. तसेच सायकलवर करही आकारला जात होता. नंतर नागरिकांच्या मागणीनंतर हा कर रद्द करण्यात आला. त्या काळात शहरात हजारो सायकली नोंदणीकृत होत्या.

आज सायकलचा वापर केवळ प्रवासापुरता मर्यादित राहिलेला नाही. फिटनेससाठी सायकलिंग हा लोकप्रिय पर्याय बनला आहे. नियमित सायकल चालवल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. शरीरातील अतिरिक्त कॅलरी कमी होतात आणि वजन नियंत्रणात राहते. सायकलिंगमुळे हृदयाचे आरोग्य सुधारते, स्नायू मजबूत होतात आणि शरीर अधिक सक्रिय राहते.

तज्ज्ञांच्या मते, नियमित सायकल चालवल्याने मानसिक आरोग्यालाही फायदा होतो. ताणतणाव, चिंता आणि नैराश्य कमी करण्यास मदत मिळते. सायकल चालवताना लक्ष केंद्रित करावे लागते, त्यामुळे एकाग्रताही वाढते. याशिवाय रक्तातील चांगल्या कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढवण्यास आणि मधुमेहाशी संबंधित गुंतागुंत कमी करण्यासही सायकलिंग उपयुक्त ठरू शकते.

पर्यावरण संरक्षणासाठीही सायकल महत्त्वाची भूमिका बजावते. सायकल चालवताना कोणतेही प्रदूषण होत नाही. त्यामुळे वाढत्या वायूप्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर अनेक देश सायकल वापराला प्रोत्साहन देत आहेत. नेदरलँड्ससारख्या देशांमध्ये सायकलसाठी स्वतंत्र मार्गांची व्यवस्था करण्यात आली आहे. भारतातील अनेक शहरांमध्येही सायकल ट्रॅक विकसित केले जात आहेत.

आजच्या धावपळीच्या जीवनात सायकल ही केवळ जुन्या आठवणींचा भाग नसून निरोगी जीवनशैलीचा महत्त्वाचा आधार बनली आहे. फिटनेस, पर्यावरण संवर्धन आणि इंधन बचत या तिन्ही गोष्टींसाठी सायकल हा सर्वोत्तम पर्याय मानला जातो. त्यामुळे जागतिक सायकल दिनानिमित्त सायकल वापरण्याची सवय लावणे ही काळाची गरज ठरत आहे.

# लातूर मध्ये ७ जून रोजी 'संडे ऑन सायकल' मोहिमेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** भारत सरकारच्या क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाद्वारे 'खेलो इंडिया' योजनेच्या 'फिट इंडिया' उपक्रमांतर्गत रविवार, ७ जून २०२६ रोजी लातूर शहरात 'संडे ऑन सायकल' या विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांमध्ये तंदुरुस्ती व नियमित व्यायामाचे महत्त्व रुजवण्यासाठी तसेच लठ्ठपणाशी लढण्यासाठी आयोजित केलेल्या या सायकल रॅलीचा मार्ग जिल्हा क्रीडा संकुल येथून सुरू होऊन राजीव गांधी चौक, वाडा हॉटेल, पी.व्ही.आर. चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे पुन्हा जिल्हा क्रीडा संकुल असा निश्चित करण्यात आला आहे.

तरी या मोहिमेमध्ये जिल्ह्यातील सर्व क्रीडाप्रेमी, नागरिक, सायकलिंग क्लब, शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थी आणि खेळाडूंनी ७ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ७ वाजता मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि या उपक्रमासाठी https://fitindia.gov.in/world-bicycle-day या संकेतस्थळावर आपली नोंदणी करावी, असे आवाहन लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

शांतता करार मार्गी लागून जगावरील तेलसंकट दूर करण्याऐवजी ट्रम्प यांनी मध्येच अब्राहम कराराचे पिलू सोडले. आखातातील धग यामुळे आणखी वाढली. इराणवर हल्ला करून जागतिक स्तरावर आपली दंडेलशाही सुरू ठेवण्याची अमेरिकेची खेळी पूर्ण फसली. कोणत्याही स्थितीत टोकाची बेअब्रू टाळणे, हाच आता अमेरिकेचा प्राधान्यविषय आहे. इस्रायलच्या लेबाननवरील जोरदार हल्ल्यांमुळे त्यात अडथळा आला आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांचे याच कारणावरून बिनसले. या दोघांमध्ये झालेल्या संभाषणाची चर्चा जगजाहीर झाली असून पुन्हा एकदा ट्रम्प हास्याचा विषय ठरले आहेत! नेतन्याहू यांना ट्रम्प यांनी बरेच अपशब्द वापरले. सुसंस्कृत वर्तन आणि सभ्य भाषा यांच्याशी ट्रम्प यांचे वैर आहे; पण स्पर्धक अथवा शत्रूंऐवजी आपल्याच मित्र देशाच्या प्रमुखासाठी ही भाषा वापरण्याची वेळ त्यांच्यावर आली. अमेरिकेत ज्यू धर्मीयांचा गट प्रभावी आहे आणि अमेरिकी सरकारच्या निर्णयावर या गटाचा अंकुश असतो, ही वस्तुस्थिती. मात्र; असे असताना देखील अमेरिकेच्या अलीकडच्या एकाही अध्यक्षाने इस्रायलबरोबर एखाद्या देशाविरुद्धच्या युद्धात उतरण्याचा निर्णय घेतला नव्हता. ट्रम्प यांच्या लेखी हे पूर्वाध्यक्ष महामूर्ख आणि भित्रे होते! आपण, आपला देश सर्वसामर्थ्यवान आहोत, या गंडाने पछाडलेल्या ट्रम्प यांनी अविवेकी निर्णय घेतला. इराण झुकण्यास तयार नाही. जाहीरपणे आणि पडद्याआडून शांतता करारासाठी ट्रम्प उतावीळ झाले आहेत. यातून त्यांचे मानसिक संतुलन ढासळत चालले आहे. नुकताच त्यांच्या प्रकृतीसंदर्भातील अहवाल व्हाईट हाऊसद्वारे प्रसिद्धीस देण्यात आला. ते ठणठणीत असल्याचे अहवाल सांगतो; पण प्रश्न शारीरिक तंदुरुस्तीचा नसून मानसिक प्रकृतीचा आहे.

वेडाचाराची परिसीमा

कोणत्याही स्थितीत अमेरिकेला इराण युद्धातून सहजासहजी बाहेर पडता येऊ नये, ही रशिया आणि चीन यांची भूमिका. ती स्वाभाविक मानता येईल. स्वतःचे सक्षम सैन्यदल नसताना युक्रेनसारखा देश रशियाला दीर्घकाळ झुंजवत ठेवतो, यामागचे कारण उघड आहे. इराणबरोबरच्या अमेरिकेच्या संघर्षाकडे रशिया त्याच दृष्टीने पाहतो. चीनकडून इराणला होणारी शस्त्रास्त्रांची मदत रोखण्यासाठी ट्रम्प यांना चीन दौरा करावा लागला. त्यातून फार काही साध्य झाले, असे म्हणण्यासारखी स्थिती आज नाही. इराणचे सरकार आणि इराणच्या मोठ्या भूभागावर प्रत्यक्ष नियंत्रण असलेले रिव्हॉल्युशनरी गार्ड

# जिवलग मित्रांचे बिनसले!



यांच्यातील मतभेद टोकाला गेल्याने युद्धबंदीसाठीच्या करारात आधीच अडथळे आले आहेत. पहिल्या पायरीपासून नागरी नेतृत्वाची मोठी फळी संपवल्याचा आनंद ट्रम्प साजरा करत होते. ती वेडाचाराची परिसीमा होती. आता ते नेतृत्व नसल्याने करार प्रत्यक्षात येणे ही अडथळ्यांची शर्यत ठरणार आहे. एकीकडे अमेरिकेने युद्धविराम जाहीर केला; पण इस्रायल माघारीसाठी तयार नाही. लेबाननमधील हिज्बउल्लाचे तळ नष्ट करण्यासाठी इस्रायलचे हल्ले सुरूच आहेत. या स्थितीत इराण शांतता करार मान्य करणार नाही हे तर उघड होते. इराणने त्याबद्दल धमकी दिल्यावर ट्रम्प यांनी नेतन्याहू यांना फैलावर घेतले. 'तू पूर्ण वेडा झाला आहेस. मी पाठीशी नसतो तर तुझी जागा तुरुंगात असती', या शब्दांत ट्रम्प यांनी नेतन्याहू यांना सुनावलेच, त्याचवेळी बरीच शिवीगाळ देखील केली! इस्रायलला असलेला धोका जोपर्यंत संपत नाही तोपर्यंत हल्ले थांबणार नाहीत, हे थेट शब्दांत सांगून नेतन्याहू यांनी ट्रम्प यांना फटकारले. वाजवी कारण नसताना मित्र देशाच्या मागे फरफटत जाण्याची मोठी किंमत ट्रम्प यांना चुकवावी लागणार आहे. त्यांच्या आततायी निर्णयामुळे संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था धोक्यात आली असून सर्वच देशांमध्ये सर्वसामान्यांना त्याचे चटके बसण्यास सुरुवात झाली आहे. पारदर्शकतेचा अभाव, वर्चस्ववादी मानसिकता, जागतिक व्यवस्थेसाठी असलेले नियम-संकेत याबद्दल अनास्था, यातून अमेरिकेवर ही वेळी आली. अमेरिका सामर्थ्यवान आहे; पण जमिनीवरील युद्ध ती जिंकू शकत नाही, हे जगाला दिसले. इराणमध्ये जमिनीवर उतरून लढण्याची हिंमत ट्रम्प यांना दाखवता आली नाही. व्हिएतनाम, अफगाणिस्तान यानंतर अमेरिकेच्या झालेल्या नामुष्कीला ट्रम्प कारण ठरले. इस्रायलचे ओझे झुगारून त्यांना अमेरिकेची सुटका करून घेता येते का, हे लवकरच दिसेल.

# व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता दूर करायची आहे?

आजकाल आपल्यापैकी बरेच जण व्हिटॅमिन बी१२ च्या कमतरतेची तक्रार करतात, बी१२ ची कमतरता. आपल्यापैकी बरेच जण या कमतरतेमुळे त्रस्त आहेत. थकवा, अशक्तपणा, केस गळणे, मनःस्थितीत होणारे बदल आणि वारंवार आज-ारी पडणे या गोष्टी आजकाल सामान्य झाल्या आहेत. बरेच जण आराम मिळवण्यासाठी सप्लिमेंट्सचा आधार घेतात. -डडज ठए-ऊ पोटऱ्यांच्या दुखण्यापासून सुटका कशी मिळवायची,



५ उपयुक्त गोष्टी जाणून घ्या

डॉक्टरांचा असा विश्वास आहे की यापैकी अनेक समस्यांचे मूळ कारण व्हिटॅमिन बी१२ ची कमतरता आहे.त्यामुळे जर तुम्हीही या समस्येशी झुंजत असाल, तर आपल्या आ-हारात या एका गोष्टीचे सेवन करा. ज्या मुळे बी१२ झपाट्याने वाढते.

शेवग्याची पाने -एक असा सुपरफूड आहे जो या समस्येवर लक्षणीयरीत्या उपाय करू शकतो. ती आहे शेवग्याची पाने बी१२ जीवनसत्त्वाच्या कमतरतेवर एक नैसर्गिक उपाय आहेत. फक्त वाळलेली शेवग्याची पाने रोजच्या आहारात, जसे की डाळ, ब्रेड, भाज्या किंवा पिठात मिसळा आणि तुम्हाला फक्त दोन महिन्यांतच लक्षणीय बदल दिसून येतील.

अननस ठरेल उन्हाळ्यातील सुपरफूड! पचना-पासून रोगप्रतिकारशक्तीपर्यंत अनेक फायदे

सेवन कसे करावे -याचे सेवन करणेही खूप सोपे आहे. तुम्ही ते पावडरच्या स्वरूपात घेऊ शकता, जी बाजारात सहज उपलब्ध असते. रोज एक चमचा ही पावडर पिठात मिसळून पोळ्या बनवा, किंवा डाळ, भात किंवा भाजीमध्ये घाला. जर झाड जवळ असेल, तर ताजी पाने उकळून भाजीमध्ये वापरा. तुमची इच्छा असल्यास, ते दह्यामध्ये मिसळून सकाळी रिकाम्या पोटी खा.

प्रोटीन पावडर पिण्यापूर्वी ही काळजी घ्या, नुकसान संभवतात

या गोष्टी लक्षात ठेवा-याव्यतिरिक्त, जर तुम्हाला बी१२ ची पातळी सामान्य ठेवायची असेल, तर तुमच्या सिडिटीवर नेहमी लक्ष ठेवा आणि अँटासिडचे सेवन कमी करा. आरओ पाण्याऐवजी चांगल्या प्रकारे गाळलेले पाणी वापरा. गरज भासल्यास, मिथाइलकोबालामिन सप्लिमेंट्ससाठी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. दररोज सकाळी १०-१५ मिनिटे सूर्यप्रकाश घ्या. अस्वीकरण : या लेखात दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत वेबदुनिया कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.


# आवडीचे थंड हवेचे ठिकाण: माथेरान

चरींहशीरपमुंबई आणि पुणे इथून सर्वात जवळचे आणि तरीही निसर्गसौंदर्याने नटलेले असे हे ठिकाण आहे. २,६०० फूट उंचीच्या पठारावर माथेरान वसलेले आहे. सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून जरा वेगळी पडलेली माथेरानची ही डोंगररांग हाजीमलंगपासून सुरू होते. १८५० मध्ये ह्युज मॅलेट या ठाण्याच्या कलेक्टरने हे ठिकाण शोधून काढले. मुंबईहून कर्जतला जाताना नेरळ स्टेशनला उतरून माथेरान गाठता येते. नेरळ हे गाव माथेरानच्या पायथ्याशी वसलेले आहे. माथेरानला जाणारी ट्रेन नेरळहून सुटते आणि २१ कि.मी. चे अंतर दोन तासात पार करते. या गाडीतल्या प्रवासाची मौज लुटणे, हे माथेरान भेटीतील एक प्रमुख आकर्षण असते. ही ट्रेन पेब आणि माथेरानच्या पॅनोरमा पॉईंटच्या मधील खिंडीतून पॅनोरमा पॉईंटला वळसा घालून माथेरानमध्ये प्रवेश करते. इथे कुठल्याही प्रकारच्या वाहनांना प्रवेश नाही त्यामुळे इथल्या निसर्गसौंदर्याला अजूनतरी प्रदुषणाचे गालबोट लागलेले नाही. जिथून पुढे वाहनांना प्रवेश नाही



त्या दस्तुरी नाक्यावरून २०-२५ मिनीटे चालल्यानंतर मध्यभागी असलेल्या मार्केटमध्ये येतो. बहुतेक हॉटेल्सही याच भागात आहेत. माथेरानमधील विविध पॉईंटस् -शार्लोट लेक-मार्केटपासून १ कि.मी. अंतरावर हे तळे आहे. येथील पाण्याचा मुख्य स्रोत हे तळेच आहे पॅनोरमा पॉईंट-उत्तर टोकावरील या पॉईंटच्या पूर्व व पश्चिम बाजूला दरी आहे. इथून पूर्वेच्या बाजूला नेरळ, तर पश्चिमेला गाडेश्वर तलाव आणि पनवेलपर्यंतचा मुलूख दिसू शकतो. हा मार्केटपासून लांब म्हणजे साडेपाच कि.मी. अंतरावर आहे. सन सेट पॉईंट-ह्या पॉईंटच्या समोरच प्रबळगड दिसतो. मार्केटपासून अंतर साधारण साडेतीन कि.मी. आहे. सन सेट पॉईंटखालून वाघाच्या वाडीतून ट्रेकिंग करत वर येता येते.चौक पॉईंट-हा पॉईंट माथेरानच्या दक्षिणेकडे आहे. येथून खाली चौक गाव दिसते, म्हणून या नावाने तो ओळखला जातो. इथे जवळच वन ट्री हिल पॉईंट आहे, त्या पॉईंटच्या समोरच मति गुंग करणारी भीषण दरी आहे. इथून जाणारी पायवाट एका सुळक्याला जाऊन मिळते. त्या सुळक्यावर बरीच वर्षे एकच झाड होते, तो सुळका म्हणजे वन ट्री हिल पाईंट.-गार्बट पॉईंट- येथील सर्वात दुर्लक्षिलेला असा हा पॉईंट आहे. एका बाजूला दरी व दुस-या बाजूला जंगल अशा रस्त्यावरून चालत आपण या पॉईंटला येतो. इथे येण्यात खरी मजा पावसाळयात आहे. धुक्यांनी वेढलेल्या जंगलातून पावसाळयात भटकण्याची ज्यांना आवड आहे, त्यांच्यासाठी पावसाळाही इथे भेट देण्यासाठीचा उत्तम मोसम आहे. पावसाच्या मा-यामुळे कुठल्याही पॉईंटला जाणे शक्य होत नाही. पण धुक्याचे लोट अंगावर घेण्याची ज्यांना आवड आहे, त्यांनी पावसाळयातही जरूर यावे. इथल्या लोकांचा उदरनिर्वाह पर्यटनावर अवलंबून आहे. मार्केटमध्ये ब-याच हस्तकौशल्य असलेल्या वस्तूंचे स्टॉल्स आहे. सांबराच्या कातडयाच्या वहाणा व बूट, तसेच वेताची काठी, छोटया छोटया चपलांचे सेट अशा ब-याच वस्तू इथे स्थानिक विक्रेते विकताना दिसतात. इथे माकडांचे प्रमाण जास्त आहे. आपण खात असताना हातातील खाद्यपदार्थांचा पुडा पळवून नेऊ शकतात, इतकी ती माणसाळलेली आहेत.माथेरानमध्ये राहण्याच्या ब-याच सोयी आहेत. दस्तुरी पॉईंटला लागूनच एम.टी.डी.सी.ची रेस्ट हाऊसेस आहेत. इतरही बरीच लहान-मोठी हॉटेल्स आहेत. नेरळ-माथेरान गाडीच्याही मोजक्याच चकरा असल्याने त्या वेळेवर पाळाव्या लागतात. जे स्वतःची गाडी घेऊन येतात, त्यांना गाडया दस्तुरी पॉईंटजवळ लावाव्या लागतात. याशिवाय नेरळ-माथेरान टॅक्सी सेवाही उपलब्ध आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



हळदीचे दूध-कोरड्या खोकल्यापासून पूर्णपणे बरं होण्यासाठी हळदीचे दूध अत्यंत प्रभावी असते. रात्री झोपण्याच्या आधी ते घ्यावे.कोमट पाणी पिण्याच्या सवयीमुळे शरी-रातील चयापचय दर वाढतो, त्यापेक्षा कोमटपाणी कोरडा खोकला दूर करण्यास प्रभावी आहे. दिवसांतून ३ वेळा कोमट पाणी प्यायल्याने खोकल्यावर त्वरित आराम मिळू शकतो. वाफ घेणे. वाफ घेतल्याने आ-पणास द्रुत आणि प्रभावी परिणाम मिळतात. गरम पाण्याची वाफ घेणे हा एक सोपा आणि घरघुती उपाय आहे. आपण कधीही ते करू शकता. घश्यात होणारी खवं-खवं आणि थंडपणावर त्वरीत आराम होतो.

## २ Joke — विनोद





चल माझा टॉप काढ...

एका मुलीने आपल्या बॉयफ्रेंडला सरळ आपल्या खोलीत नेले.

मुलगी - चल माझा टॉप काढ...

थांबलास का...स्कर्टपण काढ.... आणि यापुढे माझे कपडे घालण्याचा प्रयत्न करू नको...

## ३ Message — संदेश



Tamanna ly k ulfat ki
Mery aangan me wo aaya
phr me ne 1 rupy ka sikka
diya
Or
Laat maar k bhagaya

## ४ Thought — सुविचार



एखाद्या सच्च्या वैज्ञानिकाला जर त्याच्या विज्ञानाविषयी एखादा अत्यंत गहन प्रश्न विचारला तर तो वैज्ञानिक नि:शब्द होईल, आणि एखाद्या सच्च्या धार्मिक मनुष्याला जर त्याच्या धर्माविषयी एखादा अत्यंत साधा प्रश्न विचारला तर तो धार्मिक मनुष्य कृद्ध होईल. - केदार जोशी


**संस्कृत सुभाषित**

मद्यपस्य कुत: सत्यं, दया मांसाशिन: कुत:।
कामिनश्च कुतो विद्या, निर्धनस्य कुत: सुखम् ।।

अर्थ : दारूच्या आधीन झालेल्या माणसाला सत्य ठाऊक नसते, मांसाहाराची आवड असणाऱ्याला दया नसते, स्त्रीविषयी आत्यंतिक कामवासना असणाऱ्याला विद्या कुठून मिळणार आणि दरिद्री माणसाला सुख कसे मिळणार?

पण जेथे चंदनानीच जंगले भरलेली तेथे सरपणासाठी त्याचा उपयोग होतो, हे अति परिचयामुळेच होते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. दृष्टी
३. तात्काळ उत्तर देणारा
८. टाळ्यांचा आवाज
११. भ्रमर, भुंगा
१२. नेत्रकटाक्ष
१३. दशानन
१४. नातेवाईक
१५. पार्थिव
१७. झुणक्याबरोबरची रोटी
१८. बळेच काढलेला मुहूर्त
१९. जाडसर पीठ
२१. विनाश करणारी
२२. नम्र, वाकलेला
२४. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था
२६. पाच दिवसाचा क्रिकेट सामना
३०. फळातील द्रव
३२. आप्त नसलेला
३३. खोटेपणा
३४. सम्राट
३५. खूप, पुष्कळ
३७. वर्षभर
३९. लाकूड कापण्याचे हत्यार
४१. रत्नमाला, रत्नांची माळ
४३. कापूस
४६. उभाच्या उभा!
४७. उत्कृष्ट बल्लवाचार्य म्हणून प्रसिद्ध असलेला दमयंतीचा पती
५०. अयोध्येचा राजा
५२. उत्तराधिकारी
५४. चंद्र
५५. थंडगार
५७. मातीचा सूक्ष्म कण
५८. कोळिष्टकावरील धागे
६०. श्वासरोग
६१. चणचण, दुर्भिक्ष्य
६२. परमेश्वर
६३. चट्टामट्टा
६५. फूल
६७. पवित्र
६९. सर्वत्र सांगत सुटणे
७१. निपचित
७३. फोडातील द्रव
७४. बलुतोदारी व्यवस्थेतील गावप्रमुख
७६. जन्म
७७. खोल खाई
७८. दरोडा
७९. बाळाच्या हातातील मणिबंध

### उभे शब्द

१. देवीचा उत्सव
२. श्रीविष्णूचे एक नाव
३. उगीच
४. अटीची भाषा
५. लोकसंख्येची मोजणी
६. क्रिकेटमधील अवांतर धाव (इंग्रजी)
७. पुंगी
८. नारायण राणे यांचे गाव
९. कंबरेवर
१०. हजरा किलो
१६. पाठविलेला
१७. लुच्ची
१८. राघोबांचे नारायणरावांशी नाते
२०. वेडावाकडा
२१अ. थंडीची लाट
२३. मऊ
२५. शिकार
२७. सर्प
२८. एक सुगंधी वनस्पती
२९. कुरापत
३१. मदतनीस
३३. आघात
३६. बाण
३६अ. मुस्लीम
३८. लोणच्यातील रस
४०. समशेर
४२. अधाशी, लालची
४४. हातातून निसटणारे खनिज
४५. सर्वांना सारखे
४६. नावाडी
४८. तर्क
४९. मनीची इच्छा
५१. संगोपन, लाडकोड पुरवणे
५२अ. ऊभदार पांघरुण
५३. गोंधळ
५६. पोळी भाजण्याचे साधन
५९. माजलेला, गर्वीष्ठ
६०. धमकावणी
६१अ. संधी, मोका
६४. रांग
६६. हृदय
६८. रोख
६९. पांढुरका रंग
७०. हिंदीत शपथ
७२. तऱ्हा, प्रकार
७४. फलक
७५. नेम, उद्दिष्ट

### आडवे उत्तरे

१.नजर ३.हजरजबाबी ८.कडकडाट ११.मधुकर १२.नयनबाण १३.रावण १४.ना-तलग १५.कलेवर १७.भाकर १८.काढीव १९.रवा २१.विनाशिका २२.लीन २४.नासा २६.कसोटी सामना ३०.रस ३२.परका ३३.लबाडी ३४.महाराज ३५.अतिशय ३७.बारमाह ३९.करवत ४१.रत्नहार ४३.कपास ४६.खडा ४७.नल ५०.राम ५२.वारसदार ५४.रजनीश ५५.शीतल ५७.रज ५८.जळमट ६०.दमा ६१.वानवा ६२.ईश ६३.फस्त ६५.सुमन ६७.पावन ६९.कळवाकळवी ७१.गपगार ७३.लस ७४.पाटील ७६.जनन ७७.दरी ७८.डाका ७९.मनगटी

### उभे उत्तरे

१.नवरात्र २.रमण ३.हकनाक ४.जरतर ५.जनगणना ६.बाय ७.बीन ८.कणकवली ९.कडेवर १०.टन १६.रवाना १७.भामटी १८.काका २०.वाकडा २१अ.शीतलहर २३.नरम २५.सावज २७.साप २८.मरवा २९.खोडी ३१.सहायक ३३.प्रहार ३६.शर ३६अ.यवन ३८.खार ४०.तलवार ४२.हावरट ४४.पारा ४५.समसमान ४६.खलाशी ४८.अंदाज ४९.मनीषा ५१.लालनपालन ५२अ.रजई ५३.रळफळ ५६.तवा ५९.मस्तवाल ६०.दमदाटी ६१अ.वाव ६४.ओळ ६६.काळीज ६८.नगद ६९.करडा ७०.कसम ७२.परी ७४.पाटी ७५.लक्ष्य



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### वैभव सूर्यवंशीला घराबाहेर पडणेही झालेय कठीण, गावात परतल्यावर नेमके काय झाले?

मुंबई–राजस्थान रॉयल्सकडून आयपीएलमध्ये धडाकेबाज कामगिरी करून देशभरात चर्चेत आलेला युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी आपल्या बिहारमधील समस्तीपूर जिल्ह्यातील ताजपूर या मूळ गावी परतला. अवघ्या १५ वर्षांच्या या क्रिकेटपटूचे गावकऱ्यांनी जल्लोषात स्वागत केले. त्याला पाहण्यासाठी आणि सेल्फी घेण्यासाठी चाहत्यांची मोठी गर्दी झाली होती. वैभवच्या यशामुळे संपूर्ण ताजपूर गाव अभिमानाने भारावून गेले आहे. आयपीएलनंतर गावात परतलेल्या वैभवचे जल्लोषात स्वागत. आयपीएलमध्ये आपल्या आक्रमक फलंदाजीने क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतल्यानंतर वैभव सूर्यवंशी प्रथमच आपल्या मूळ गावी परतला. ताजपूरमध्ये त्याच्या स्वागतासाठी ग्रामस्थ, मित्र, नातेवाईक आणि क्रिकेटप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. गावात ठिकठिकाणी त्याचे स्वागत करण्यात आले. अनेकांनी फुलांचे हार घालून आणि घोषणाबाजी करत या युवा खेळाडूचा सत्कार केला. सेल्फीसाठी चाहत्यांची झुंबड– वैभवला प्रत्यक्ष पाहण्यासाठी आसपासच्या गावांतील नागरिकही मोठ्या संख्येने ताजपूरमध्ये दाखल झाले.

### फुटबॉलमध्ये मोठे बदल ! वर्ल्ड कपपूर्वी फिफाकडून नवीन नियमांची घोषणा

मुंबई–फिफा वर्ल्ड कप २०२६ ची सुरुवात ११ जूनपासून होणार आहे. यंदाचा वर्ल्ड कप अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशात खेळवला जाणार आहे. प्रथमच ४८ संघ सहभागी होणार असल्याने स्पर्धा अधिक भव्य होणार आहे. पण चर्चा फिफाने प्रस्तुत केलेल्या नवीन नियमांची होत आहे . खेळातील शिस्त, पारदर्शकता आणि वेळेचा अपव्यय रोखण्यासाठी इध्इअ ने अनेक कठोर नियम लागू केले जातील अशी घोषणा केली आहे .
फिफा वर्ल्ड कप २०२६ साठी लागू केलेले नवे नियम–१. तोंड झाकून बोलल्यास थेट रेड कार्ड सामन्यादरम्यान खेळाडू अनेकदा तोंड झाकून संवाद साधताना दिसतात. मात्र आता हा प्रकार महागात पडू शकतो. वादग्रस्त किंवा संघर्षाच्या प्रसंगी एखादा खेळाडू हात, जर्सीने तोंड झाकून बोलताना दिसल्यास त्याला थेट रेड कार्ड दाखवले जाणार आहे.२. थ्रो–इन आणि गोल किकसाठी ५ सेकंदांचा नियमअनेकदा खेळाडू वेळ काढण्यासाठी गोल किक आणि थ्रोच्या वेळी काही ना काही नाटक करताना दिसतात. हा प्रकार थांबवण्यासाठी फिफाने आता गोल किक आणि थ्रो करण्यासाठी पाच सेकंदांचा वेळ निश्चित केला आहे.

### टीम इंडियाचे वाढणार टेन्शन? अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटी सामन्यातून बुमराहनंतर हा स्टार गोलंदाज बाहेर?

दिल्ली–अफगाणिस्तान कसोटीपूर्वी टीम इंडियाचे टेन्शन वाढताना दिसत आहे. ६ जूनपासून न्यू चंदीगड इथल्या महाराजा यादवेंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर क्रिकेटचा थरार पाहिला मिळणार आहे. पण त्यापूर्वी टीम इंडियाबद्दल एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. भारताचा प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह या सामन्यातून विश्रांती देण्यात आली आहे. आता टीम इंडियाच्या जबाबदारी ही मोहम्मद सिराजच्या खांद्यावर होती. पण मिळालेल्या माहितीनुसार अफगाणिस्तान कसोटीमध्ये मोहम्मद सिराजच्या खेळावर सस्पेन्स कायम आहे. टीओआयच्या वृत्तानुसार, मोहम्मद सिराज सध्या चंदीगडमध्ये वैद्यकीय पथकाच्या देखरेखेखाली आहे. तिथे त्याच्या तंदुरुस्तीबद्दल आणि कामाच्या भाराबाबतचा पुढील दोन दिवसांत निर्णय घेण्यात येणार आहे. त्यामुळे टीम इंडिया व्यवस्थापन कोणताही धोका पत्करण्यास तयार नाही, कारण सिराज गेल्या दोन महिन्यांपासून सातत्याने क्रिकेट खेळत आहे.

### मुंबई इंडियन्सने आयपीएलचे पूर्ण पैसे दिले नाहीत, स्टार खेळाडूच्या आरोपानंतर खळबळ

मुंबई–आयपीएल २०२६ चा थरारक हंगाम नुकताच संपला असून ३१ मे रोजी या हंगामाचा महाअंतिम सामना खेळवला गेला. मात्र, हा हंगाम संपून अवघे तीन दिवस उलटत नाही तोच क्रिकेट जगतातून एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक बातमी समोर आली आहे. आयपीएलमधील सर्वात यशस्वी आणि श्रीमंत फ्रेंचायझींपैकी एक असलेल्या ममुंबई इंडियन्सफ्वर एका स्टार परदेशी खेळाडूने मानधनाचे पूर्ण पैसे न दिल्याचा गंभीर आरोप केला आहे. हा खेळाडू दुसरा कोणी नसून न्यूझीलंडचा ऑलराउंडर मिचेल सँटनर आहे. मिचेल सँटनर हा आयपीएल २०२६ च्या हंगामात दुखापतीमुळे मुंबई इंडियन्ससाठी पूर्ण सामने खेळू शकला नव्हता. सँटनरने आता एका पॉडकास्टमध्ये दावा केला आहे की, मुंबई इंडियन्सने त्याला करारातील मानधनाची केवळ अर्धीच रक्कम दिली आहे. मुंबई इंडियन्सने सँटनरला २ कोटी रुपयांच्या किमतीत रिटेन केलं होतं. दुखापतीचे निमित्त करून सँटनर न्यूझीलंडच्या कसोटी संघात सामील झाल्याचा आरोपही त्याच्यावर झाला होता.

## सूर्याच्या फॉर्मला 'ग्रहण', टी-२० संघाचं कर्णधारपद जाणार?

**नवी दिल्ली :** भारतीय टी–२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवची खराब कामगिरी मुंबई टी–२० लीगमध्येही कायम आहे. ट्रायम्प नाईट्स संघाचे नेतृत्व करणाऱ्या सूर्याला नॉर्थ मुंबई पँथर्सविरुद्धच्या २१० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना १२ चेंडूत अवघ्या १९ धावा करता आल्या. गेल्या १८ महिन्यांपासून फलंदाजीत अपयशी ठरणाऱ्या सूर्याच्या टी–२० संघातील स्थानावर आणि कर्णधारपदावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.
भारतीय टी–२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने २०२६ मध्ये झालेल्या टी–२० वर्ल्डकप स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला होता. कर्णधार म्हणून सूर्या सुपरहिट ठरला होता. पण फलंदाजीत तो पूर्णपणे फ्लॉप ठरला. भारताच्या वर्ल्डकप विजयामुळे त्याच्या फलंदाजीवर प्रश्न उपस्थित केले गेले नव्हते. त्यानंतर आयपीएलमध्येही त्याचा फ्लॉप शो पाहायला मिळाला. आता मुंबई टी–२० लीग स्पर्धेतही सूर्याची बॅट शांत राहिली आहे.
मुंबई टी–२० लीग स्पर्धेला जोरदार सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील स्टार आणि मुंबईचे लोकल स्टार खेळाडू एकत्र खेळताना दिसून येणार आहेत. या स्पर्धेत सूर्यकुमार यादव ट्रायम्प नाईट्स संघाचं नेतृत्व करत आहे. मुंबई नॉर्थ मुंबई पँथर्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात ट्रायम्प नाईट्सचा संघ २१० धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. पण या धावांचा पाठलाग करताना सूर्याला १२ चेंडूत अवघ्या १९ धावा करता आल्या. हा सामना



ट्रायम्प नाईट्स संघाला गमवावा लागला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा सूर्यकुमार यादवच्या फॉर्मवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहे. ट्रायम्प नाईट्सचा संघ या सामन्यात २१० धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या ट्रायम्प नाईट्स संघाला सुरुवातीलाच मोठे धक्के बसले. सलामीवीर स्वस्तात माघारी परतल्यानंतर सूर्यकुमार यादव फलंदाजीसाठी मैदानात उतरला. त्याने सुरुवातीला काही फटके मारुन पावरप्लेमध्ये संघाची धावसंख्या २ गडी बाद ५६ धावांवर पोहोचवली.
पावरप्लेमध्ये चांगली सुरुवात मिळाल्यानंतर सूर्यकुमार यादववर टिकून राहण्याची आणि संघाला विजय मिळवून देण्याची जबाबदारी होती. पण डावखुऱ्या हाताचा फिरकीपटू राहुल सावंतने सूर्याला आपल्या जाळ्यात अडकवलं आणि त्याला १९ धावांवर बाद करत माघारी धाडलं. ट्रायम्प नाईट्सकडून नुतन गोयलने ५६ चेंडूंचा सामना करत ९३ धावांची खेळी केली. पण ही खेळी संघाला विजय मिळवून देण्यासाठी पुरेशी नव्हती. ट्रायम्प संघाला ८ गडी बाद १८८ धावांपर्यंत मजल मारता आली. सूर्याची कामगिरी पाहता, त्याच्या टी–२० संघातील स्थानावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहेत. गेल्या १८ महिन्यांपासून त्याला फलंदाजीत सूर गवसलेला नाही. येत्या काही दिवसात भारतीय संघ अफगाणिस्तानविरूद्ध कसोटी आणि वनडे मालिका खेळणार आहे. त्यानंतर आयर्लंडविरूद्धची टी–२० मालिका आणि त्यानंतर भारतीय संघ न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहे. आयपीएल २०२६ स्पर्धेतील १३ सामन्यांमध्ये त्याला अवघ्या २७० धावा करता आल्या. तर टी–२० वर्ल्डकपमध्येही त्याची बॅट शांतच राहिली होती. अशीच कामगिरी सुरु राहिली, तर त्याचं कर्णधारपद काढून घेतलं जाऊ शतकं. यासह टी–२० संघातून स्थानही गमवावं लागू शकतं.

## फुटबॉलचा थरार; फिफा वर्ल्ड कप २०२६ चा बिगुल वाजले

### ४८ देशांच्या महासंग्रामासाठी जग सज्ज!



मेक्सिको सिटी,३ जून (पीए–सआय)
फुटबॉल विश्वातील सर्वात मोठी स्पर्धा असलेल्या फिफा वर्ल्ड कप २०२६ च्या तयारीने आता वेग घेतला आहे. या स्पर्धेने इतिहासातील अनेक विक्रम मोडीत काढले आहेत. ११ जून २०२६ रोजी मेक्सिको सिटीमधील ऐतिहासिक 'अझ्टेक स्टेडियम'वर होणाऱ्या भव्य उद्घाटन सामन्याने या महाकुंभाचा प्रारंभ होणार आहे. विशेष म्हणजे, फिफाच्या इतिहासात प्रथमच तब्बल ४८ संघ या स्पर्धेत नशीब आजमावणार आहेत. उत्तर अमेरिकेतील तीन देश – अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको – संयुक्तपणे या भव्य स्पर्धेचे यजमानपद भूषवत आहेत, ज्यामुळे फुटबॉल चाहत्यांसाठी हा एक अविस्मरणीय सोहळा ठरणार आहे. स्पर्धेचा थरार १९ जुलै २०२६ पर्यंत रंगणार असून, न्यू जर्सी येथील 'मेटलाइफ स्टेडियम'वर खेळल्या जाणाऱ्या अंतिम सामन्याने या स्पर्धेचा विजेता घोषित केला जाईल. स्पर्धेच्या वेळापत्रकावर नजर टाकल्यास, ११ जून ते २७ जून या कालावधीत ग्रुप स्टेजचे (साखळी सामने) सामने रंगतील, त्यानंतर २८ जून ते ३ जुलै या काळात 'राउंड ऑफ ३२' आणि ४ ते ७ जुलै दरम्यान 'राउंड ऑफ १६' चे सामने पार पडतील. स्पर्धेतील उत्कंठा ९ जुलैपासून सुरू होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीत अधिक वाढेल, तर १४ आणि १५ जुलै रोजी उपांत्य फेरीचे सामने फुटबॉलप्रेमींना खिळवून ठेवतील. भारतीयांसाठी ही स्पर्धा अधिक खास असणार आहे, कारण 'झी एंटरटेनमेंट' ने या स्पर्धेचे भारतातील प्रसारण हक्क मिळवले आहेत. त्यामुळे चाहते हे सामने 'युनायटेड ८ स्पोर्ट्स चॅनलवर आणि 'झी५'ॲपवर घरबसल्या बघू शकतील.




यंदाच्या फिफा वर्ल्ड कपमध्ये खेळाच्या दर्जासह शिस्तीवरही विशेष भर देण्यात आला आहे. खेळाडूंचा वेळ वाया घालवण्याच्या वृत्तीला आळा घालण्यासाठी फिफाने काही कडक नियम लागू केले आहेत, ज्याचे पालन करणे प्रत्येक संघाला बंधनकारक असेल. तसेच, यजमान देशांमधील दमट हवामानाचा विचार करता, खेळाडूंच्या प्रकृतीची काळजी घेण्यासाठी प्रत्येक सामन्यादरम्यान तीन मिनिटांचा विशेष 'हायड्रेशन ब्रेक' देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खेळाच्या मैदानाबाहेरील आव्हानांचा विचार करता, अमेरिका–इराणमधील राजकीय तणावाचे सावटही काही प्रमाणात स्पर्धेवर दिसून आले. इराणने सुरक्षिततेच्या कारणास्तव आपले सामने मेक्सिकोत हलवण्याची विनंती फिफाकडे केली होती, परंतु फिफाने ती फेटाळून लावत वेळापत्रक जैसे थे ठेवण्याचा ठाम निर्णय घेतला आहे, ज्यामुळे स्पर्धा नियोजित ठिकाणीच पार पडणार हे निश्चित झाले आहे. या स्पर्धेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे लिओनेल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो यांसारख्या दिग्गज खेळाडूंचा सहभाग. हे दोन्ही फुटबॉल सम्राट विक्रमी सहाव्यांदा विश्वचषकाच्या मैदानात उतरणार असून, त्यांच्या चाहत्यांसाठी ही एक ऐतिहासिक पर्वणी असणार आहे. ४८ संघ, तीन यजमान देश आणि जगभरातील करोडो चाहत्यांच्या उपस्थितीत २०२६ चा हा फिफा विश्वचषक फुटबॉलच्या इतिहासात एक नवा अध्याय लिहिण्यासाठी सज्ज झाला आहे.

## सूर्याचे आयपीएल नंतर या स्पर्धेतही फ्लॉप शो सुरुच

नवी दिल्ली –भारतीय टी–२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने २०२६ मध्ये झालेल्या टी–२० वर्ल्डकप स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला होता. कर्णधार म्हणून सूर्या सुपरहिट ठरला होता. पण फलंदाजीत तो पूर्णपणे फ्लॉप ठरला. भारताच्या वर्ल्डकप विजयामुळे त्याच्या फलंदाजीवर प्रश्न उपस्थित केले गेले नव्हते. त्यानंतर आयपीएलमध्येही त्याचा फ्लॉप शो पाहायला मिळाला. आता मुंबई टी–२० लीग स्पर्धेतही सूर्याची बॅट शांत राहिली आहे. मुंबई टी–२० लीग स्पर्धेला जोरदार सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील स्टार आणि मुंबईचे लोकल स्टार खेळाडू एकत्र खेळताना दिसून येणार आहेत. या स्पर्धेत सूर्यकुमार यादव ट्रायम्प नाईट्स संघाचं नेतृत्व करत आहे. मुंबई नॉर्थ मुंबई पँथर्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात ट्रायम्प नाईट्सचा संघ २१० धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. पण या धावांचा पाठलाग करताना सूर्याला १२ चेंडूत अवघ्या १९ धावा करता आल्या. हा सामना ट्रायम्प नाईट्स संघाला गमवावा लागला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा सूर्यकुमार यादवच्या फॉर्मवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहे.ट्रायम्प नाईट्सचा संघ या सामन्यात २१० धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या ट्रायम्प नाईट्स संघाला सुरुवातीलाच मोठे धक्के बसले. सलामीवीर स्वस्तात माघारी परतल्यानंतर सूर्यकुमार यादव फलंदाजीसाठी मैदानात उतरला. त्याने सुरुवातीला काही फटके मारुन पावरप्लेमध्ये संघाची धावसंख्या २ गडी बाद ५६ धावांवर पोहोचवली.
पावरप्लेमध्ये चांगली सुरुवात मिळाल्यानंतर सूर्यकुमार यादववर टिकून राहण्याची आणि संघाला विजय मिळवून देण्याची जबाबदारी होती. पण डावखुऱ्या हाताचा फिरकीपटू राहुल सावंतने सूर्याला आपल्या जाळ्यात अडकवलं आणि त्याला १९ धावांवर बाद करत माघारी धाडलं. ट्रायम्प नाईट्सकडून नुतन गोयलने ५६ चेंडूंचा सामना करत ९३ धावांची खेळी केली. पण ही खेळी संघाला विजय मिळवून देण्यासाठी पुरेशी नव्हती. ट्रायम्प संघाला ८ गडी बाद १८८ धावांपर्यंत मजल मारता आली.
सूर्याची कामगिरी पाहता, त्याच्या टी–२० संघातील स्थानावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहेत. गेल्या १८ महिन्यांपासून त्याला फलंदाजीत सूर गवसलेला नाही. येत्या काही दिवसात भारतीय संघ अफगाणिस्तानविरूद्ध कसोटी आणि वनडे मालिका खेळणार आहे. त्यानंतर आयर्लंडविरूद्धची टी–२० मालिका आणि त्यानंतर भारतीय संघ न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहे. आयपीएल २०२६ स्पर्धेतील १३ सामन्यांमध्ये त्याला अवघ्या २७० धावा करता आल्या. तर टी–२० वर्ल्डकपमध्येही त्याची बॅट शांतच राहिली होती. अशीच कामगिरी सुरु राहिली, तर त्याचं कर्णधारपद काढून घेतलं जाऊ शतकं. यासह टी–२० संघातून स्थानही गमवावं लागू शकतं.

## आनंदाची बातमी! असा असेल भारतीय संघाचा न्युझीलंड दौरा

मुंबई,३ जून –भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी मोठी अपडेट समोर आली आहे. न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने भारताच्या आगामी न्यूझीलंड दौऱ्याचं अधिकृत वेळापत्रक जाहीर केलं आहे. तब्बल ५ टी–२०, ५ वनडे आणि २ कसोटी सामने अशा १२ सामन्यांच्या मालिकेसाठी टीम इंडिया ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहे.
१२ सामन्यांची ऐतिहासिक मालिका ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या भारत विरुद्ध न्युझीलंड मालिकेत तब्बल १२ सामने खेळले जाणार आहेत. सात वर्षांत पिहल्यांदा भारत एका दौऱ्यात येवढे सामने खेळणार आहे. त्यामुळे ही मालिका दोन्ही संघांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. या मालिकेसाठी क्रिकेट चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे.या दौऱ्याची सुरुवात पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेपासुन होणार आहे. भारतीय संघ २२ ऑक्टोबरपासून आपल्या दौऱ्याची सुरुवात करणार आहे. ख्राईस्टचर्चच्या हॅगली ओव्हल मैदानावर पहिला टी–२० सामना रंगणार असून, त्यानंतर दोन्ही संघांमध्ये पाच सामन्यांची टी–२० मालिका खेळली जाईल.
न्युझीलंडमध्ये भारत आणि न्युझीलंडमधील पहिल्यांदा पाच सामन्यांची टी–२० मालिका खेळली जाणारा आहे.







टी–२० मालिकानंतर वनडे मालिका
टी–२० मालिकेनंतर भारत आणि न्यूझीलंड यांच्यात पाच सामन्यांची वनडे मालिका होणार आहे. आगामी आयसीसी स्पर्धांच्या तयारीच्या दृष्टीने ही मालिका महत्त्वाची मानली जात आहे. वनडे मालिकेची सुरुवात चार नोव्हेंबरपासून होणार आहे. तर अखेरचा सामना नोव्हेंबर १५ ला खेळला जाणार आहे.कसोटी मालिकेवर सर्वांचे लक्ष्य दौऱ्यातील पहिला कसोटी सामना १९ नोव्हेंबरपासून वेलिंग्टनच्या बेसिन रिझर्व्ह मैदानावर खेळवला जाईल. तर दुसरी आणि अंतिम कसोटी २७ नोव्हेंबरपासून ख्राईस्टचर्च येथे रंगणार आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (ऊण) दृष्टीने ही मालिका निर्णायक ठरू शकते. भारतीय संघ सध्या ५२ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे.

भारत विरुद्ध न्यूझीलंड संपूर्ण वेळापत्रक

टी–२० मालिका
- २२ ऑक्टोबर – पहिला टी–२०, ख्राईस्टचर्च
- २४ ऑक्टोबर – दुसरा टी–२०, ख्राईस्टचर्च
- २६ ऑक्टोबर – तिसरा टी–२०, ऑकलंड
- २९ ऑक्टोबर – चौथी टी–२०, हॅमिल्टन
- ३१ ऑक्टोबर – पाचवा टी–२०, टौरंगा

वनडे मालिका
- २ नोव्हेंबर – पहिला वनडे सामना
- ५ नोव्हेंबर – दुसरा वनडे सामना
- ८ नोव्हेंबर – तिसरा वनडे सामना
- ११ नोव्हेंबर – चौथा वनडे सामना
- १४ नोव्हेंबर – पाचवा वनडे सामना

कसोटी मालिका
- १९ ते २३ नोव्हेंबर – पहिली कसोटी, वेलिंग्टन
- २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर – दुसरी कसोटी, ख्राईस्टचर्च

तिकिटांसाठी चाहत्यांमध्ये उत्सुकता
भारताच्या सामन्यांना मोठी गर्दी होण्याची शक्यता मानली जात आहे. यामुळे न्यूझीलंड क्रिकेटने चाहत्यांसाठी ऑगस्ट महिन्यापासून प्री–सेल नोंदणीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विराट कोहली, शुभमन गिल, यशस्वी जैयस्वाल आणि इतर स्टार खेळाडूंना पाहण्यासाठी चाहत्यांमध्ये आतापासूनच उत्साह दिसून येत आहे.

# मराठा आरक्षणासंदर्भात कक्ष स्थापन करणार: जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

## न्यायमूर्ती शिंदे समितीला ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणासंदर्भात कक्ष स्थापन करण्यात येणार असून आरक्षणासंदर्भातील नोंदी शोधणे, कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र आदीबाबत नागरिकांना सहाय्य करण्यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात येणार आहे; तसेच प्रमाणपत्रासंदर्भात अडचणी दूर करण्यासाठी मंत्रालयातील कार्यालयात ९३२६५६२८१५ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू केला असून कार्यालयीन वेळेत या क्रमांकावर संपर्क साधता येईल, अशी माहिती जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

मराठा आरक्षण उपसमितीची बैठक मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात नुकतीच झाली. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील, आमदार प्रसाद लाड, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार सिंह, पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, 'सारथी'चे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख; तसेच गृह, महसूल सामान्य प्रशासन विभागाच्या वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त, लातूर, धाराशिव आदी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

मंत्री विखे-पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात दिलेल्या आश्वासनांची पुर्तता निर्धारित वेळेत करण्यासाठी सर्व विभागांनी प्रशासकीय स्तरावर समन्वयाने कार्यवाही सुरु करावी. मराठा आरक्षणाच्या प्रश्नाबाबत संवेदनशीलतेने निर्णय होण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी गांभिर्याने काम करावे. हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर वेळप्रसंगी कारवाई करण्यात येईल.

न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या नोंदी, शिंदे समितीच्या स्थापनेनंतर १३ लाख दाखल्यांचे झालेले वितरण; तसेच समिती स्थापन होण्यापूर्वी कुणबी प्रमाणपत्राचे झालेले वाटप याची माहिती जिल्हा आणि तालुका स्तरावर तातडीने संकलित करावी. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांनी दाखले वितरित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पुढील तीन महिन्यांमध्ये गृहभेटी, विशेष शिबिरे आयोजित करुन याची जबाबदारी



जिल्हाधिकारी यांच्यावर निश्चित करावी. या कामाचा आढावा दर आठवड्याला घेण्यात यावा, अशा सूचनाही मंत्री विखे-पाटील यांनी दिल्या.

जात पडताळणी प्रमाणपत्र वितरित करण्याबाबत दर १५ दिवसांनी विभागीय आयुक्त आढावा घेतील, असे सूचित करुन मंत्री विखे-पाटील म्हणाले की, मराठा आरक्षण कक्ष स्थापन करणे, आंदोलना दरम्यान मृत्यूमुखी पडलेल्या आंदोलकांच्या वारसांना अर्थसहाय्य देण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी. जिल्हाधिकारी कार्यालयात कुणबी प्रमाणपत्र मिळण्याबाबत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी हेल्पलाईन नंबर पुढील आठ दिवसांत कार्यान्वित करावा. शासन निर्णयानुसार स्थापन करण्यात आलेल्या ग्रामस्तरीय समितींच्या कामांचा आढावाही जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावा असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

न्यायमूर्ती शिंदे समितीला ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय मंत्री मंडळ उपसमितीने घेतला असून, सारथी समितीमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संस्थेंचे बळकटीकरण करण्यावर सविस्तर चर्चा झाली. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून व्याज परतावा अदा करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत आणि महामंडळाच्या कामाबाबत; तसेच नवीन प्रकरणांना मंजुरी देताना होणारे दायित्व विचारात घेऊन पुढील पाच वर्षांचा आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत मूल्यसाखळी भागीदार निवडीसाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून प्रस्ताव आमंत्रित

**लातूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील सोयाबीन, करडई, तीळ, भुईमूग आणि सूर्यफूल या प्रमुख तेलबिया पिकांच्या शाश्वत विकासासाठी राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया सन २०२६-२७ अंतर्गत पीकनिहाय मूल्य साखळी भागीदार म्हणून पात्र शेतकरी उत्पादक कंपन्यांची निवड करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. लातूर जिल्हा तेलबिया समितीमार्फत निवडल्या जाणाऱ्या या भागीदार संस्थांना अभियानांतर्गत शेतकरी प्रशिक्षण देणे, प्रमाणित बियाणे वितरण करणे, शेतकरी शेतीशाळा चालवणे, मूल्यसाखळी समूहातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे माती परीक्षण करणे आणि 'कृषी मॅपर' पोर्टलवर लाभार्थ्यांची अचूक माहिती भरणे यासारखे महत्त्वपूर्ण घटक व उपक्रम राबवावे लागणार आहेत.

या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी इच्छुक कंपन्या किंवा संस्था कंपनी कायदा अथवा सहकारी कायद्यांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक असून, संबंधित तालुक्यात काम करण्याचा त्यांना किमान ३ वर्षांचा अनुभव असावा म्हणजेच त्यांची नोंदणी माहे मार्च २०२३ पूर्वीची असणे बंधनकारक आहे. यासोबतच संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी किंवा सहकारी संस्थेमध्ये किमान २०० शेतकरी सभासद म्हणून नोंदणीकृत असावेत, सहकारी संस्था असल्यास तिच्या उद्दिष्टामध्ये तेलबिया पिकांशी संबंधित कामकाजाचा स्पष्ट उल्लेख असावा आणि मागील ३ वर्षांतील त्यांची सरासरी वार्षिक उलाढाल ९ लाख रुपयांपेक्षा जास्त असावी. शेतकरी उत्पादक कंपन्यांमध्ये शेतकऱ्यांचा किमान ३ लाख रुपयांचा समभाग असावा तसेच कमी उत्पादकता असणाऱ्या तालुक्यांमध्ये कार्यरत असलेल्या, सरकारकडून आधीच अनुदान प्राप्त झालेल्या आणि केंद्र सरकारच्या १० हजार शेतकरी उत्पादक संघ योजनेअंतर्गत किंवा नाफेड व एनएससी-ओएस सारख्या सार्वजनिक संस्थांकडे नोंदणीकृत असलेल्या तेलबिया क्षेत्रातील कंपन्यांना या निवड प्रक्रियेत विशेष प्राधान्य दिले जाईल.

तरी उपरोक्त सर्व पात्रता व निकष पूर्ण करणाऱ्या लातूर जिल्ह्यातील इच्छुक शेतकरी उत्पादक कंपन्यांनी आपले परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे १५ जून २०२६ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

# श्रीमती प्रयागअक्का कराड आयुर्वेद रुग्णालयातर्फे पंधरा दिवसीय मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिर

## आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त शिबीराचे आयोजन; रुग्णांना लाभ घेण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** माईसर्, पुणे संचलित लातूर येथील श्रीमती प्रयागक्का कराड आयुर्वेद रुग्णालयाच्या वतीने लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक मा. आ. श्री. रमेशअप्पा कराड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पंधरा दिवसीय मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिराचे उद्घाटन एमआयटीचे परिसर समन्वयक श्री. पृथ्वीराजदादा कराड यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



पंधरा दिवसीय मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी एमआयटी मेडिकल कॉलेजचे अधिष्ठता डॉ. एन. पी. जमादार, अकॅडमीक व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, प्रशासकीय अधिकारी मधुकरराव गुटे, तसेच आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत चाटे, उपप्राचार्य डॉ. बंडगर सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी शिबिराच्या अनुषंगाने मौलिक मार्गदर्शन करून जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमास प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर रुग्ण तपासणीस प्रारंभ करण्यात आला असून शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

लातूर येथील एमआयटी परिसरात श्रीमती प्रयागक्का कराड आयुर्वेद रुग्णालय हे शंभर खाटांचे सुसज्ज रुग्णालय असून येथे आयुर्वेदातील एम.डी. व एम.एस. पदवीधारक अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग, मणक्यांचे आजार तसेच इतर दीर्घकालीन व दुर्धर आजारांवर आयुर्वेद पद्धतीने उपचार, योग्य जीवनशैलीविषयक सल्ला व मार्गदर्शन दिले जाते.

रुग्णालयात अत्याधुनिक सुविधांनी युक्त फिजिओथेरपी विभाग कार्यरत असून आहार व्यवस्थापन, तणाव व्यवस्थापन, रोगप्रतिबंधक आरोग्य मार्गदर्शन तसेच निरोगी जीवनशैलीबाबत विशेष समुपदेशन केले जाते. तसेच रक्त व लघवी तपासणी, सोनोग्राफी, एक्स-रे, पंचकर्म विभाग आणि विविध आयुर्वेदिक उपचार केले जात असून या शिबिराच्या निमित्ताने रुग्णांसाठी रक्त व लघवी तपासणी, सोनोग्राफी, एक्स-रे तसेच विविध पंचकर्म उपचार, आयुर्वेदिक उपचार प्रक्रिया आणि शस्त्रक्रिया यांवर पन्नास टक्के विशेष सवलत देण्यात येणार आहे. तेव्हा या शिबिराचा जास्तीत जास्त गरजू नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती प्रयागक्का कराड आयुर्वेद रुग्णालयाच्या अधिक्षक डॉ. दीप्ती नरहरे यांनी केले.

# निलंगा आगारात वाहकाकडून ज्येष्ठ नागरिकाला मारहाण

**निलंगा/प्रतिनिधी:** वस्तीजवळ गाडी थांबवण्याची विनंती केल्यानंतर वाहकाने ज्येष्ठ नागरिकाच्या गचांडीला धरून गाडीच्या बाहेर ढकलल्याची घटना घडली. या प्रकरणी निलंगा पोलीस ठाण्यात वाहकाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, प्रवासी रावसाहेब माधव नाईकवाडे (वय ८६, रा. इनामवाडी) हे निलंगा बसस्थानकातून निलंगा-बोटकुळ चिचोंडी या एसटीमध्ये बसून ते आपल्या गावी इनामवाडीकडे निघाले. त्यांनी वाहकाला तिकीट मागितले. मात्र, त्यांनी तिकीट दिले नाही.

बस इनामवाडी येथे गेली असता माझी वस्ती आली, मला येथेच उतरू द्या, असे नाईकवाडे म्हणाले. गाडी थांबवण्याची विनंती करूनही वाहक अभिजित लोहार यांनी गाडी कुठेच थांबणार नाही, तुम्हाला पुढच्या गावात उतरावे लागेल, असे म्हणून हुज्जत घातली. मी म्हातारा माणूस आहे, बाहेर अंधार झाला आहे, अशी वारंवार विनंती केल्यानंतर चालक बालाजी मोरे यांनी गाडी थांबवली. मात्र, वाहक लोहार यांनी नाईकवाडे यांच्या गचांडीला धरून शिवीगाळ करीत एसटीबाहेर ढकलले. तुला टायर खाली घालतो म्हणून शिवीगाळ केली. यावरून वाहक लोहार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश





**लातूर/प्रतिनिधी:** चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालय, लातूरच्या विद्यार्थ्यांनी आणखी एक यशस्वी टप्पा गाठला असून त्यांची Eversure Polybond Pvt. Ltd. या नामांकित कंपनीमध्ये कृष्णा पाटील आणि मन्मथ पळसकर यांची Trainee Executive पदासाठी निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास, कौशल्य विकास तसेच महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे हे यश संपादन झाले आहे. या निवडीमुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण व उत्कृष्ट प्लेसमेंट उपक्रमांची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य, प्राध्यापकवृंद तसेच प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाने निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलचे समन्वयक श्री.नारागुडे अमोल डी. यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांचे हे यश संपूर्ण महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे.

# बीआयएस स्टँडर्ड मार्कशिवाय चिपबोर्ड स्क्रू आणि टॅपिंग स्क्रू थ्रेड असलेले ड्रिलिंग स्क्रूची विक्रीसाठी साठवण आणी विक्री करणाऱ्या फर्मवर बीआयएस छापा

**पुणे/पिआयबि:** भारतीय मानक ब्युरोच्या पुणे शाखा कार्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने २ जून २०२६ रोजी मेसर्स XDX फास्टनर्स इंडिया प्राइवेट लिमिटेड, उरुली देवाची, पुणे, ४१२३०८ च्या परिसरात छापा टाकून जप्ती केली. शोधादरम्यान, कंपनी गुणवत्ता नियंत्रण आदेशाचे उल्लंघन करताना आढळून आली कारण फर्म बीआयएस मानक चिन्हाशिवाय चिपबोर्ड स्क्रू आणि टॅपिंग स्क्रू थ्रेड असलेले ड्रिलिंग स्क्रू विक्रीसाठी साठवण आणी विक्री करत होती. अशा मोठ्या प्रमाणात चिपबोर्ड स्क्रू आणि टॅपिंग स्क्रू थ्रेड असलेले ड्रिलिंग स्क्रू चे अंदाजे २८००० बॉक्स टीमने जप्त केले आहेत. ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड क्ट, २०१६ कायद्यानुसार, कोणतीही व्यक्ती प्रमाणित चिन्हाशिवाय,



अशा कोणत्याही वस्तू, प्रक्रिया, प्रणाली किंवा सेवेचे उत्पादन, आयात, वितरण, विक्री, भाड्याने, भाड्याने, स्टोअर किंवा विक्रीसाठी प्रदर्शन करू शकत नाही, ज्यामध्ये केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत राजपत्र आदेशाद्वारे अनिवार्य प्रमाणन अंतर्गत अधिसूचित केले आहे.

ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड क्ट, २०१६ अंतर्गत गुन्हेगारांविरुद्ध बीआयएस पुणे शाखा कार्यालयाकडून कारवाई सुरू केली जात आहे. हा गुन्हा बीआयएस कायद्याच्या कलम १७ चे उल्लंघन आहे आणि त्याला २ वर्षांपर्यंत कारावास किंवा किमान २ लाख रूपये दंड अशी शिक्षा आहे. प्रथम उल्लंघनासाठी BIS कायदा, २०१६ च्या कलम २९(३) नुसार सक्षम न्यायालयात खटला चालवला जाईल. अनेकवेळा असे आढळून आले आहे की अनिवार्य बीआयएस प्रमाणन अंतर्गत बीआयएस मानक चिन्हाशिवाय उत्पादने किंवा बनावट आयएसआय चिन्ह असलेली उत्पादने तयार केली जातात आणि मोठ्या नफ्यासाठी सामान्य ग्राहकांना विकली जातात. म्हणून, लोकांनी बीआयएस वेबसाइट http://www.bis.gov.in ला भेट देऊन किंवा BISA केअर पद्वारे खरेदी करण्यापूर्वी उत्पादनावर अनिवार्य इखड प्रमाणन आणि/किंवा ISI मार्कची वास्तविकता अनिवार्य करणारे गुणवत्ता नियंत्रण आदेश तपासले पाहिजेत. त्यामुळे सामान्य जनतेला विनंती करण्यात आली आहे की, खरेदी करण्यापूर्वी प्रत्येक वस्तूंवर ISI चिन्ह तपासावे आणि कोणत्याही उत्पादनावर ISI मार्कचा गैरवापर किंवा गुणवत्ता नियंत्रण आदेशांचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास, त्याची माहिती पुणे शाखा कार्यालय, भूखंड क्रमांक ६५७ ते ६६०, एमआयडीसी बिल्डिंग, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे येथे दिली जाऊ शकते. बी.आय.एस. कडे अशा तक्रारी complaintsbis.gov.in या पत्त्यावर ईमेलद्वारे, BIS CARE APP वर किंवा दूरध्वनी क्रमांक ०२०२४२६८५९४ वर देखील केल्या जाऊ शकतात. अशा माहितीचा स्त्रोत गोपनीय ठेवला जाईल.

# जागृती शुगर इंडस्ट्रीजच्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल संस्थापक अध्यक्ष दिलीपरावजी देशमुख यांचा मांजरा संचालकांच्या वतीने सत्कार

**लातूर प्रतिनिधी:** राज्यातील खाजगी साखर उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत व राज्यस्तरीय स्तरावर नावलौकिक मिळवलेल्या जागृती शुगर इंडस्ट्रीजला केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल कारखान्याचे मार्गदर्शक तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे यांचा विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या वतीने बुधवारी आशियाना बंगल्यावर सत्कार करण्यात आला.

यावेळी सत्कार सोहळ्यास मांजरा साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन अशोकराव काळे, माजी व्हाइस चेअरमन श्रीशैल उटगे, ऊस विकास समिती अध्यक्ष कैलास पाटील, तात्यासाहेब देशमुख वसंत उफाडे, सदाशिव कदम, अनिल दरकसे ,मदन भिसे ,धनराज दाताळ ,शंकरराव बोळंगे, निळकंठ बचाटे, नवनाथ काळे ,सचिन शिंदे, ज्ञानेश्वर पवार , बालाजी पांढरे, दयानंद बिडवे ,भैरू कदम तज्ञ संचालक कदम सुरेश चव्हाण, श्रीकृष्ण काळे , विलास चामले, अरुण कापरे




तक्रार निवारण समिती अध्यक्ष तानाजी जाधव, कार्यकारी संचालक पंडित देसाई कामगार प्रतिनिधी शत्रुघ्न पाटील आदींची सदस्य उपस्थिती होती.

जागृती शुगर इंडस्ट्रीजने स्थापनेपासून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, गुणवत्तापूर्ण साखर उत्पादन, ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी जपलेले विश्वासाचे नाते आणि पर्यावरणपूरक उपक्रमांच्या माध्यमातून साखर उद्योगात वेगळी ओळख निर्माण केली तसेच मराठवाडा विदर्भ विभागात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक भाव देणारा कारखाना ठरला आहे. उत्पादन क्षमता वाढ, कार्यक्षम व्यवस्थापन आणि शेतकरी हिताला केंद्रस्थानी ठेवून केलेल्या कामामुळे कारखान्याने राज्यातील आघाडीच्या साखर उद्योगांमध्ये स्थान मिळवले आहे.

### जागृति चा पुरस्कार एकत्रित प्रयत्नाचे फलित

या पुरस्कारामुळे जागृती शुगर इंडस्ट्रीजच्या गुणवत्तापूर्ण कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली असून, हा सन्मान कारखान्याशी संबंधित शेतकरी, कर्मचारी आणि व्यवस्थापन यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित असल्याची भावना यावेळी जागृति शुगर चे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी व्यक्त केली.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# परंडा तहसील कार्यालयावर राष्ट्रवादी काँग्रेस(शरदचंद्र पवार)चे निवेदन



परंडा (धाराशिव) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या तालुकानिहाय जिल्हा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आज परंडा तहसील कार्यालयात तहसीलदारांना विविध लोकहिताच्या प्रश्नांबाबत निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी महागाई, वाढती बेरोजगारी, डिझेल दरवाढ, पेपरफुटी तसेच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (डखठ) आणि मतदार यादीतील त्रुटी यांसारख्या गंभीर विषयांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांची तात्काळ दखल घेऊन त्यावर प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या प्रसंगी तालुकाध्यक्ष किरण कराळे, जिल्हा सचिव सुवास ठोंगे, शहराध्यक्ष शहाबर्फीवाले सर, युवक तालुका अध्यक्ष प्रवीण गरड, शिवाजी गायकवाड, जिल्हा संघटक अमोल सुरवसे, दशरथ चाबुकसवर, सज्जन गोडगे, तालुकाध्यक्ष कुंभार साहेब, माजी सैनिक हनुमंत चव्हाण, अब्दुल पटेल, कल्याणराव थिटे, मारुती कांबळे, दादासाहेब केमदारने, महावीर महाराज, ऋषिकेश पाटील, अनिल नाईकवाडी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागरिकांच्या प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून न्याय द्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.


# तेरच्या संग्रहालयातील हस्तीदंताची स्त्री मूर्ती पर्यटकांचे आकर्षण

तेर (प्रतिनिधी)- धाराशिव तालुक्यातील तेर येथील तगर अभ्यासक रेवणसिद्ध लामतुरे यांच्या खाजगी संग्रहालयात जतन करण्यात आलेली हस्तीदंताची स्त्री मूर्ती देश-विदेशातील पर्यटक, इतिहास अभ्यासक आणि संशोधकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. अंदाजे १८०० ते २४०० वर्षांपूर्वीची ही मूर्ती प्राचीन तगर नगरीच्या समृद्ध सांस्कृतिक आणि कलात्मक वारशाची साक्ष देणारी मानली जाते.

साडेबारा सेंटीमीटर उंचीची ही स्त्री मूर्ती हस्तीदंतापासून तयार करण्यात आली असून तिची शिल्पकला अत्यंत बारकाईने साकारलेली आहे. मोहक चेहरा, सडपातळ बांधा, मोठे डोळे, आकर्षक केशभूषा आणि नाजूक अलंकार यांमुळे ही मूर्ती विशेष लक्ष वेधून घेते. कपाळावरील बिंदी, कानातील नक्षीदार डूल, गळ्यातील हार, बाजूबंद, बांगड्या आणि कमरेभोवतीची मेखला यांमधून तत्कालीन भारतीय स्त्रीच्या शृंगार संस्कृतीचे दर्शन घडते.

मूर्तीच्या माथ्यावर असलेल्या छिद्रामुळे ती राजघराण्यातील आरशाची मूठ किंवा राजवैभवाचे प्रतीक म्हणून सिंहासनावर बसविलेली असावी, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. प्राचीन काळी तगर नगरीत हस्तीदंतावर कलाकुसर करणारे गृहउद्योग मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होते. त्या काळातील हस्तीदंताच्या वस्तूंची निर्यात परदेशात होत असल्याचे पुरावेही उपलब्ध आहेत. या अद्वितीय कलाकृतीमुळे तेरच्या इतिहासाचा जागतिक स्तरावर परिचय होत असून संग्रहालयाला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत आहे.संग्रहालयातील या दुर्मिळ हस्तीदंताच्या मूर्तीमुळे तेर परिसराला ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीने नवे महत्त्व प्राप्त झाले आहे. स्थानिक पातळीवरही या वारशाबाबत जागरूकता वाढत असून विद्यार्थ्यांसाठी सहलींचे आयोजन केले जात आहे.

तगर नगरीचा समृद्ध वारसा शिल्पकलेतून उजागर प्राचीन काळातील तगर (आताचे तेर) हे भारतातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र म्हणून ओळखले जात होते. रोमन साम्राज्यासह अनेक देशांशी तगरचे व्यापारी संबंध होते. उत्खननातून येथे हस्तीदंत, मातीची भांडी, नाणी आणि विविध कलावस्तू सापडल्या आहेत. हस्तीदंतावरील उत्कृष्ट कलाकुसर ही तगरची विशेष ओळख मानली जाते. त्यामुळे तेरला भारतीय पुरातत्त्व आणि इतिहास संशोधनात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.



# समता सैनिक दलाशी एकनिष्ठ राहण्याचे आवाहन:उमरगा येथील आयोजित समता सैनिक दलाचे प्रशिक्षण मेळाव्यात ॲड.भंडारे यांचे आवाहन



उमरगा समता सैनिक दलाच्या सर्व सैनिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी आणि त्यांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाशी एकनिष्ठ राहून समाज परिवर्तनाचे कार्य पुढे न्यावे, असे आवाहन समता सैनिक दलाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड. डॉ. एस. के. भंडारे यांनी केले. ते उमरगा येथे आयोजित समता सैनिक दलाच्या प्रशिक्षण शिबिर व मेळाव्यात बोलत होते.

समता सैनिक दलाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन तालुकाध्यक्ष बौद्धाचार्य उमेश सुरवसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आले. यावेळी प्रशिक्षक मेजर मल्हार लोंढे, समता सैनिक दलाचे सैनिक आणि प्रशिक्षणार्थींनी ध्वजाला सलामी दिली. शिबिरात ८९ जणांनी प्रशिक्षण घेतले, तर ११५ सैनिकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजश्री कदम, नगरसेविका अश्विनी सोनकांबळे, सरचिटणीस विजय बनसोडे, बाळासाहेब बागडे, ब्रह्मानंद गायकवाड, आम्रपाली गौतसुर्वे, संगीता सोनकांबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पीएचडी प्राप्त झाल्याबद्दल ड. डॉ. भंडारे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत यश मिळविल्याबद्दल जिल्हाध्यक्ष राजश्री कदम आणि नगरसेविका अश्विनी सोनकांबळे यांचाही गौरव करण्यात आला.

मार्च २०२७ मध्ये समता सैनिक दलाला १०० वर्षे पूर्ण होत असल्याचे सांगताना डॉ. भंडारे यांनी प्रत्येक तालुक्यात किमान २०० गणवेशधारी सैनिक तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्याचे आवाहन केले. तसेच संविधानातील मूलभूत हक्क, अधिकार आणि कलम १४ ते ३२ यांचा अभ्यास करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

शताब्दीसाठी संघटन बळकटीवर भर समता सैनिक दलाच्या शताब्दी वर्षानिमित्त राज्यभर संघटन विस्तारावर भर दिला जात आहे. प्रत्येक तालुक्यात अधिकाधिक युवकांना प्रशिक्षण देऊन संघटन मजबूत करण्याचे उद्दिष्ट आहे. उमरगा तालुक्याने घेतलेले प्रशिक्षण शिबिर योग्य दिशेने टाकलेले पाऊल असल्याचे मत डॉ. भंडारे यांनी व्यक्त केले.


## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708

9284321472


# नुकसानग्रस्त शेतकऱ्याच्या पपईबागेची तहसीलदारांकडून पाहणी:वाशी शिवारातील ३ एकरांवरील झाडांचे नुकसान

वाशी (प्रतिनिधी)- तालुक्यात रविवारी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या शेतीची पाहणी सोमवारी (दि. १) तहसीलदारांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन केल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

रविवारी सायंकाळी वाशी तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती, शाळा व अन्य मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. सोमवारी तहसीलदार प्रकाश म्हेत्रे यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीचा आढावा घेतला. वाशी शिवारातील शेतकरी बालाजी गौतम कवडे यांच्या पपई बागेची त्यांनी पाहणी केली. कवडे यांनी तीन महिन्यांपूर्वी तीन एकर क्षेत्रावर पपईची लागवड केली होती. सध्या कळी धारणेच्या अवस्थेत असलेल्या या बागेला वादळी वाऱ्याचा मोठा फटका बसला असून हजारो झाडे तुटून पडली आहेत. त्यामुळे त्यांच्या अपेक्षित उत्पन्नावर पाणी फिरले आहे.

या नुकसानीची माहिती कवडे यांनी तलाठी अशोक राठोड यांना दिली होती. रविवारी सायंकाळी तसेच रात्री पुन्हा पाऊस झाल्याने नुकसानीत अधिक भर पडली. शेतकऱ्यांचे झालेले नुकसान पाहण्यासाठी तहसीलदार स्वतः घटनास्थळी आल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्याचे दिसून आले.

शेती नुकसानीच्या पाहणीबरोबरच तहसीलदार प्रकाश म्हेत्रे यांनी दसमेगाव येथील जिल्हा परिषद शाळेचीही पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक उपाययोजना तातडीने करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

## जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धाराशिव (उपचिटणीस शाखा)

मेन रोड, धाराशिव पिनकोड - ४१३५०१ दुरध्वनी क्र. ०२४७२-२२७३०१

Email Id-rdc1osmanabad@gmail.com

जा.क्र २०२५/उपचिटणीस/एमएजी-४/कावि-१७११/ सिआर-२६ दिनांक :- निम्नस्वाक्षरीत

### जाहिर प्रगटन
### (विस्फोटक नियम २००८ चे नियम १०७)

सर्व नागरिक मौजे. तेरखेडा ता.वाशी जि. धाराशिव यांना या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मौजे, **तेरखेडा** ता. वाशी जि. धाराशिव येथील जमीन गट नंबर **११८९** मध्ये **श्री वाहेद अक्रम शेख** रा. तेरखेडा ता. वाशी यांनी शोभेची दारू कब्जात ठेवून विक्री (फटाका विक्री) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २४ विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-५ मिळणेसाठी अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. प्रस्तावित जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

**१. पूर्व बाजू – विष्णू घोलप यांची जमिन.**
**२. पश्चिम बाजू – धर्मराज सरवदे यांचे क्षेत्र**
**३. दक्षिण बाजू – रहिमतुल्ला दारुवाले**
**४. उत्तर बाजू – सुनिल घोलप**

सदर परवानगीबाबत स्थानिक चौकशीबाबत मा.पोलीस अधीक्षक, धाराशिव/कार्यकारी अभियंता म.रा.वि.वितरण कंपनी, धाराशिव/कार्यकारी दंडाधिकारी, वाशी/कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जि.प.धाराशिव, यांचेमार्फत झालेली आहे.

तरी, **श्री वाहेद अक्रम शेख रा. तेरखेडा** ता. वाशी यांना मौजे. तेरखेडा ता. वाशी येथील जमीन गट नंबर ११८९ मध्ये शोभेची दारू कब्जात ठेवून (फटका विक्री) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २४ विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-५ ची परवानगी देणेबाबत कोणास **कांही आक्षेप असल्यास, सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले** पासून **(०८)** दिवसाचे आत समक्ष हजर राहून या कार्यालयास लेखी सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झालेस पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

Digitally Signed by
Vidyacharan Jagannath Kadavkar
Date:15-05-2026 11:24:05

**(विद्याचरण कडवकर)**
**अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव.**

**जिमाका/एके/जाहि/२५**

# जनतेच्या प्रश्नांसाठी डॉ. प्रतापसिंह पाटील यांचा तालुकानिहाय जिल्हा दौरा

धाराशिव (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील विविध जनहिताच्या प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी तालुकानिहाय व्यापक जिल्हा दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महागाई, बेरोजगारी, डिझेल दरवाढ, पेपर फुटीच्या घटना तसेच डखठ आणि मतदार यादीतील त्रुटी यांसारख्या गंभीर विषयांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा दौरा राबविण्यात येत आहे.

या दौऱ्याअंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात जाऊन संबंधित तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात येणार असून, नागरिकांच्या समस्या शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. डॉ. पाटील हे कळंब, परंडा, भूम, वाशी, उमरगा, लोहारा आणि तुळजापूर तालुक्यांना भेट देऊन स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांसमवेत प्रशासनाला निवेदने सादर करणार आहेत.

तसेच SIR आणि मतदार यादी संदर्भातील त्रुटी, नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी आणि मतदान हक्काबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी मतदार जनजागृती मोहीमही राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून नागरिकांना त्यांच्या हक्कांबाबत माहिती देण्यासोबतच मतदार यादीतील चुका दूर करण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.

यावेळी डॉ. पाटील यांनी वाढती महागाई, डिझेल दरवाढ, बेरोजगारी, पेपर फुटीच्या घटना आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांच्या अभावाबाबत शासनाला जाब विचारला आहे. नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही व्हावी, तसेच सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळावा, अशी मागणी करण्यात येणार आहे.

या जिल्हा दौऱ्याद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत असून प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न करीत आहे. जिल्हाभर सुरू असलेल्या या मोहिमेला पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले.

# शस्त्र कायद्यांतर्गतगुन्हा नोंद.

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत संकेत रा. विजोरा ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.३०.०५.२०२६ रोजी .विजोरा शिवारातीलत्याचे शेतातील पत्राचे शेडच्या शेजारील कडब्याच्या पेंढ्याखाली लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे लोखंडी तलवार एकुण १,५०० किंमतीची ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेले वाशी पोलीसांना मिळून आले. यावर पथकाने नमुद लोखंडी तलवार जप्त करुन फिर्यादी बाळासाहेब औताडे, पोलीस नाईक नेमणुक पोलीस ठाणे वाशी यांनी दिलेल्या वाशी पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649